बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ४७ | बुधवार,दि.१ नोव्हेंबर २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


## जि.प.च्या बांधकाम विभागात स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांच्या नियमबाह्य पदोन्नत्या



**गोंदिया:** येथील जिल्हा परिषदेचा बांधकाम विभाग सातत्याने विविध विषयाला घेऊन चर्चेत राहत असून आत्ता स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांच्या नियमबाह्य पदोन्नतीने पुन्हा चर्चेत आले आहे. सध्या जिल्हा परिषदेत शासन निर्णयांना तिलांजली देत २-३ वर्षापासून पदोन्नत्या देण्याचा सपाटा सुरु झालेला आहे. त्यामध्येच बांधकाम विभागाने गेल्या वर्षभरापासून नियमबाह्यरित्या स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांना कनिष्ट अभियंता पदावर पदोन्नती दिल्याचे प्रकरण समोर आले आहे.शासन ५० वर्ष पूर्ण होण्याचा दिनांक ग्राह्य धरा असे म्हणत असतांना बांधकाम विभागाने ४५ वर्ष पूर्ण होण्याचा दिनांक ग्राह्य धरण्याचे कारण काय असे अनेक प्रश्न यामाध्यमातून उपस्थित झाले आहेत. आधीच बदलीच्या दिवशी तत्कालीन अति.मुकाअ यांनी प्रभार सोपवण्यासह काही निर्णय घेतले ते सुद्धा नियमबाह्य असतांना मुकाअसह जि.प.अध्यक्ष व बांधकाम सभापती मात्र मूग गिळून बसले आहेत.

या पदोन्नत्या देतांना कार्यकारी अभियंता व सामान्य प्रशासन विभागाने नियमांची पायमल्ली करून व्यवहारिक असणाऱ्या काही स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांना कनिष्ट अभियंता या पदावर शासनाच्या ११ ऑगस्ट २०२२ च्या परिपत्रकाला वाटाण्याच्या अक्षता दाखविल्या आहेत. या शासन निर्णयात स्पष्टपणे पदोन्नतीकरीता विभागीय व व्यवसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट हवी असल्यास शासन सेवेत वयाचे १५ वर्ष सेवा पूर्ण झाल्याचा दिनांक किंवा त्याच्या वयाची ५० वर्ष पूर्ण होण्याचा दिनांक यापैकी जे नंतर घडेल त्यानंतर लगतचा दिनांक हा कर्मचाऱ्यास पदोन्नतीकरीता विभागीय व व्यवसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याचा दिनांक समजण्यात येईल असा स्पष्ट उल्लेख आहे. असे असतानाही जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने या गेल्या काही आर्थिक वर्षात केलेल्या सर्व कनिष्ठ अभियंत्याच्या पदोन्नत्या या नियम बाह्य पध्दतीने झालेल्या आहेत. या सर्व नियमबाह्य पदोन्नती प्रकरणाची तपासणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीही न करता त्या पदोन्नती फाईलवर स्वाक्षरी करुन बांधकाम विभागाच्या गैरव्यवहाराला हातभार लावल्यासारखेच होत आहे. गेल्या २-३ वर्षातील प्रकरणाची चौकशी केल्यास ३-४ पदोन्नत्या या नियम बाह्य झाल्या असून त्या स्थापत्य अभियांत्रिकीच्या पदव्या या खरंच मान्य आहेत की नाही याचीही साधी चौकशी विभागाने संबधित विभागाकडून केले नसल्याची चर्चा आहे.

स्थापत्य अभियांत्रिकी सहायक या पदावरुन कनिष्ट अभियंता पदावर पदोन्नती देतांना शासन निर्णयानुसार स्थापत्य अभियांत्रिकी सहायक पदावर कर्मचारी स्थायी असावा. अर्हता परीक्षा उत्तीर्ण असावा. व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक ( पदवी/पदविका धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना बंधनकारक नाही). त्यातच विभागस्तर व व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण पासून सूट हवी असल्यास ५० वर्ष पूर्ण किंवा सेवेची १५ वर्ष पूर्ण होण्याची जी तारीख नंतरची असेल ती पकडण्यात यावे असे म्हटलेले असतानाही या नियमालाही फाटा देण्यात आलेला आहे. जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या कार्यप्रणालीकडे बघितल्यास शासनाने ठरविलेल्या निकषांची अवहेलना करुन अर्थपूर्ण व्यवहारातून पदोन्नती प्रकरणे हाताळले जात असल्याची म्हणण्याची वेळ आली आहे.

मागील २-३ वर्षांपूर्वी झालेल्या पदोन्नती मध्ये पदोन्नत कर्मचाऱ्यांपैकी ३ कर्मचारी पूर्णपणे बेकायदेशीर पदोन्नत झाले आहेत हे उघड असूनही कोणतीही कार्यवाही अद्याप झालेली नाही.बेकायदेशीर पदोन्नत कर्मचाऱ्यांच्यावर कुठलीही कार्यवाही न झाल्याने उर्वरित स्थापत्य अभियांत्रिकी सहायक (गट ) जे दूरशिक्षण पदविकेचे प्रमाणपत्र घेऊन बसले. त्यांनी आम्हाला पण याच आधारवर पदोन्नती द्या किंवा पदोन्नत कर्मचाऱ्यावर कार्यवाही करा अशी मागणी सातत्याने करीत आले आहेत.

त्यातच नुकतेच जिल्हा परिषदेच्या लघु सिंचन विभागात ए.एन.आदमने यांना दिलेली पदोन्नतीच अवैध असल्याचे समोर आले आहे. आदमने शासन निर्णयानुसार व्यवसायिक परिक्षा सुध्दा अनुत्तीर्ण आहेत. त्यातच वयाची ५० वर्षाची अट व सेवेतील १५ वर्षाची अट सुध्दा पुर्ण केलेली नसतांना कुठल्या आधारावर पदोन्नती कार्यकारी अभियंत्याने दिली हा संशोधनाचा विषय नव्हे तर विभागीय चौकशीसह पोलीस चौकशीचा विषय ठरला आहे. तर येत्या काही काळात बी.ए.पवार,पी.आर गजभिये यांचा नावाचा सुध्दा उल्लेख असल्याची चर्चा असून हे सुध्दा व्यवसायिक परीक्षा अनुत्तीर्ण असून शासकीय सेवेतील १५ वर्षाची अट पूर्ण केलेली नाही. नियमबाह्य सूट प्राप्त कर्मचारी पदोन्नतीसाठीचे निकष पूर्ण करीत असल्याचे दाखवून आपल्या पदोन्नतीचे प्रस्ताव तयार करण्याच्या कामाला लागल्याने शासनाची दिशाभूल करणाऱ्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष देतील काय अशा प्रश्न उपस्थित झालेला आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला युवकांचा जनआक्रोश मोर्चा

**गोंदिया :-** राज्य सरकारने सुरु केलेले खासगीकरण व कंत्राटीकरण धोरण रद्द करणे, कंत्राटी पदभरती रद्द करावी, दत्तक शाळा योजना रद्द करावी, राज्य कर्मचाऱ्यांना जुनी पेंशन योजना लागू करावी, एमपीएससी व इतर विभागाकडून घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परिक्षेचे शुल्क कमी करुन १०० रुपये ठेवावे यासह इतर मागण्यांना घेऊन संयुक्त युवा छात्र संघ व संयुक्त समन्वय समिती गोंदियाच्या वतीने ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी इंदिरा गांधी स्टेडियम येथून जिल्हाधिकारी कार्यालयावर जनआक्रोश धडक मोर्चा काढण्यात आला.या जनआक्रोश मोर्च्यात सयुंक्त युवा छात्र समितीचे भुमेश्वर शेंडे,कविता उईके,चेतन उईके,प्रा.निलकंठ चिचाम,शिक्षक आमदार सुधाकर आडबले,स्टुडंटस राईटस असो.चे अध्यक्ष उमेश कोराम,ओबीसी संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष बबलू कटरे,कर्मचारी महासंघाचे लिलाधर पाथोडे,डी.टी.कावळे, जि.प.सभापती सोनु कुथे,कैलास भेलावे, ओबीसी सेवा संघाचे सावन कटरे,भुमेश ठाकरे,राजीव ठकरेले, अतुल सतदेवे,करण टेकाम,सुनिल भोंगाडे.एस.यु.वंजारी सौरभ रोकडे,पप्पू पटले,रुपाली उईके,कशिश चंद्रिकापूरे,परेश




दुरुगकर,सुनिल भरणे आदी सहभागी झाले होते.

उद्योग, ऊर्जा, कामगार आणि खनिकर्म विभागाने शासन निर्णय दि. ६ सप्टेंबर २०१३ रोजी निर्गमित केला. त्यानुसार शिक्षण व विविध विभागात मनुष्यबळ बाह्ययंत्रमार्फत पुरविण्यात येणार आहे. शासकीय नोकरी महाराष्ट्रातील सुशिक्षित तरुणाचा आहे. यात पदभरती करुन सुशिक्षित बेरोजगारांचे शोषण करण्याचे परवाने वाटप केल्या जात आहे. महाराष्ट्र राज्य सरकार या शासन निर्णयाच्या माध्यमातून नवी वेठबिगारी निर्माण करू पाहत आहे काय हा शासन आदेश तात्काळ रद्द करुन सर्व विभागातील रिक्त जागेवर कायमस्वरुपी पदभरती करावी,दत्तक शाळा योजनेचा शासन निर्णयद्द करणे,राज्य कर्मचाऱ्यांना जुनी पेंशन योजना लागू करणे,इतर विभागाकडून घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परिक्षेचे शुल्क कमी करुन १०० रुपये करण्यात यावे. आय.बी. पी.एस.टी.सी. एस. किंवा इतर खासगी संस्थामार्फत विविध पदाच्या स्पर्धा परिक्षा न घेता सर्व परिक्षा आयोगाद्वारे घेण्यात याच्या विविध शासकीय पदभरतीसाठी होणाऱ्या स्पर्धा परिक्षेतील पेपर फुटीवर नियंत्रण यासाठी कडक कायदा करण्यात यावा.समूह शाळा संकल्पना रद्द करणे राज्य शासनातील शासकीय कार्यालयातील रिक्त पदे व अनुदानित संस्थेमधील शिक्षक-प्राध्यापकांची रिक्त पदे तात्काळ भरावी आदी मागण्यांचा घेऊन निघालेल्या जनआक्रोश मोर्च्याचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सभेत रुपांतर झाले. मोर्चात विद्यार्थी, युवक, पालक, कर्मचारी, सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




## बिरसीवरुन इंडिगोचे विमान घेणार हैद्राबादकरीता उड्डाण!



**गोंदिया:** - तालुक्यातील बिरसी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ असून, या विमानतळावरील खंडित झालेली प्रवासी विमान वाहतूक सेवा लवकरच पूर्ववत होण्याच्या मार्ग पुन्हा मोकळा झाला आहे. येथून प्रवासी विमान वाहतूक सेवा सुरू करण्यास इंडिगो एअरलाइन्सने अनुकूलता दर्शविल्याची माहिती दोन महिन्यांपूर्वी पुढे आली होती. याकरीता खासदार प्रफुल पटेल यांनी पुढाकार घेतलेला होता.

इंडिगो कपंनीने विमानतळाची पाहणी करुन कंपनीने या अनुषंगाने कर्मचारी भरती प्रक्रिया सुरू केली आहे. लवकरच बिरसी विमानतळावरून इंडिगो एअरलाइन्सचे विमान "टेक ऑफ' करणार हे निश्चित झाले आहे.

बिरसी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ असून, मागील वर्षी १३ मार्च २०२२ पासून या विमानतळावरुन इंदूर-गोंदिया-हैदराबाद प्रवासी विमान वाहतूक सेवा सुरू झाली होती. मात्र, ही सेवा प्रवाशांसाठी औटघटकेचीच ठरली; सहा महिन्यांतच ती बंद झाली. २१ ऑगस्टपासून ही सेवा बंद झाली, ती पुन्हा सुरू झालीच नाही. त्यानंतर पुणे व मुंबईकरीता विमानसेवेची सातत्याने मागणी होती. गोंदियातील विद्यार्थी व नोकरीच्या निमित्ताने ये जा करणारे संख्या हैद्राबाद पेक्षा पुण्यात अधिक असल्याने गोंदिया पुणे सेवा सुरु करण्यासोबतच हैद्राबाद इंदुर असा मार्ग हवा अशी मागणी केली जात होती.

इंडिगो कंपनी बिरसी विमानतळावरुन ,हैदराबाद आणि इंदूर प्रवासी विमानसेवा सुरू करण्याचा विचार करीत आहे. कदाचित डिसेंबर अखेरपर्यंत ही सेवा सुरू होऊ शकते. शुक्रवारला इंडिगोचे पथक पाहणी करुन गेले असून पूर्वप्रक्रिया सुरू असल्याचे भारतीय विमानपत्तन प्राधिकरण बिरसीचे व्यवस्थापक शफिक शाह यांनी सांगितले.

### वयाची १८ वर्ष पूर्ण करणाऱ्या तरुण-तरुणींनो मतदार यादीत नाव नोंदवा - जिल्हाधिकारी

**गोंदिया :** १ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीच्या संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम अंतर्गत प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली असून ज्यांनी अद्याप मतदार यादीत नाव नोंदविले नाही अशा पात्र तरुण- तरुणींनी जास्तीत जास्त प्रमाणात नाव नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले आहे. उपजिल्हाधिकारी (निवडणूक) किरण अंबेकर, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे व नायब तहसिलदार अप्पासाहेब व्हनकडे यावेळी उपस्थित होते.विधानसभा मतदारसंघ ६३-अर्जुनी मोरगांव, ६४-तिरोडा, ६५-गोंदिया, ६६-आमगाव (ड्ढ). यामध्ये मतदान केंद्राची संख्या एकूण १२८४आहे.एकूण चार विधानसभा मतदारसंघात पुरुष मतदार- ५,४५,९०२. स्त्री मतदार- ५,५०,५४८. इतर- ०९, असे एकूण मतदार- १०,९६,४५९ आहेत.

## खवले मांजराची शिकार



**गोंदिया:-** नवेगाव-नागझिरा व्याघ्रप्रकल्पालगत असलेल्या भजेपार/गोंडीटोला परिसरात खवले मांजराची शिकार करण्यात आली. वनखात्याच्या अधिकाऱ्यांनी सापळा रचून आरोपी शिवकुमार कोडवते, मनोहर मसराम, राकेश कोडवते यांना अटक केली. यावेळी सर्व आरोपी त्यांच्या घरात खवले मांजराचे मटण कापत होते. त्यांच्याकडून खवले मांजराचे कापलेले अवयव, कापण्यासाठी वापरण्यात आलेली अवजारे, कुऱ्हाड, विळा, खवले मांजराचे कापलेले मांस, खवले, आतडी हे सर्व जप्त केले.

वनपरिक्षेत्र अधिकारी दिलीप कौशिक यांच्या मार्गदर्शनात ही कारवाई वनरक्षक शिवराज पिसाळ, धनंजय कोकाटे, स्वप्नील पायघान, सुनील भालेराव, सागर भेलावे, प्रणय वालदे, महेश रहांगडाले यांनी केली. पुढील कार्यवाहीसाठी वनपरिक्षेत्र तिरोडा यांना हे प्रकरण सोपवण्यात आले. आरोपींवर गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास भारतीय वनसेवेतील वनपरिक्षेत्र अधिकारी योगेंद्र सिंह (परिविक्षाधीन), वनपरिक्षेत्र अधिकारी दिलीप कौशिक व कर्मचारी करीत आहेत.

## जि.प.चा कृषी विभाग कामांविना पंगू

### मनुष्यबळाचा लवाजमा, योजना मात्र दोनच: टिचभर कामाचा वितभर पसारा

**गोंदिया:** शेती आणि शेतकरी विकासाच्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकार अंतर्गत व जिल्हा परिषदेंतर्गत असे दोन कृषी विभाग राज्यातील जिल्ह्यांत कार्यरत आहेत. मात्र अनेक वर्षांपासून जिल्हा परिषदेंतर्गत असलेल्या कृषी विभागाकडील योजना काढून घेत राज्यस्तर कृषी विभागाकडे सोपविण्यात येत आहेत. जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडील २७ योजना राज्य कृषी विभागाकडे स्थानांतरित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या विभागाकडे आता कामच राहिले नाही. बिनकामाचा विभाग, अशीच अवस्था झाली आहे.

जिल्हा परिषदेतून जिल्ह्याच्या विकासासा गाडा हाकण्यात येतो. जिल्ह्याची अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून आहे. त्याचप्रकारे मिनी मंत्रालय म्हणून ओळखण्यात येणारे कृषी विभाग महत्वाचे आहे. मात्र या विभागाकडून तब्बल २७ योजना राज्य सरकारने काढून घेत राज्य शासनाच्या कृषी विभागाकडे त्या सोपविल्या आहेत. आता राज्य कृषी विभागाकडे सरकारच्या १७८ योजनांच्या अंमलबजावणीची जवाबदारी आहे. मात्र या योजना राबविण्यासाठी राज्यस्तर कृषी विभागाकडे अधिकारी, कर्मचारी नसल्याने अडचण निर्माण होत आहे. तर जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडे योजनांचा अभाव असतानाही या विभागात अधिकारी, कर्मचारी मोठ्या प्रमाणात आहेत. त्यांच्यावर महिन्याकाठी लाखोंचा खर्च होत असल्याचा आरोप होत आहे. जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडे २७ योजना कार्यरत होत्या. खत, बियाणांची तपासणी करुन परवाने देण्याचे काम हा विभाग करत होता. १९९७ पासून या विभागाच्या योजना राज्य कृषी विभागाकडे सोपविण्यास सुरुवात करण्यात आली. आता तर गुणनियंत्रणाचे सर्व कामही राज्यस्तर विभागाकडे सोपविण्यात आले. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या कृषई विभागाकडे फक्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन व बिरसा मुंडा कृषी क्रांती या दोन योजनाच शिल्लक राहिल्याची माहिती आहे.

## डिपीडीसीमध्ये जि.प.सदस्यांना घ्या-जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**गोंदिया:-** जिल्हा नियोजन समितीमध्ये अध्यक्ष वगळुन २० जि. प. सदस्यांचा समावेश असतो. परंतु जिल्हा परिषदेच्या निवडणुकीला दीड वर्षाचा कालावधी लोटून सुध्दा जि.प. सदस्यांना जिल्हा नियोजन समितीत सामावून घेण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे. जि.प. सदस्यांना जिल्हा नियोजन समितीत नेमणुक न केल्यामुळे ग्रामिण क्षेत्रातील विकास कामावर प्रतिकुल परिणाम होत आहे. तरी जिल्हा नियोजन समितीच्या निवडणुकीची प्रक्रिया अविलंब सुरु करुन जिल्हा परिषद सदस्यांना जिल्हा नियोजन समितीत स्थान देण्यात यावे याकरीता जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहागंडाले यांच्या नेतृत्वातील ५३ सदस्यीय जि.प.सदस्यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांची भेट घेत ३० ऑक्टोंबरला निवेदन सादर केले.विशेष म्हणजे नियोजन समितीमध्ये जि.प.सदस्यांना डावलण्यात येत असल्याचे वृत्त बेरार टाईम्सने सातत्याने लक्ष वेधले आहे.

तसेच जिल्हा परिषदे मार्फत जिल्हा वार्षीक योजने अंतर्गत विविध योजना राबविण्यांत येत असतात. सदर योजनेचे नियोजन व कामे जिल्हा परिषदेच्या विविध विभागामार्फत करण्यांत येत असतात. सदर योजने अंतर्गत मंजुर नियतव्ययाच्या अधिन राहून जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण समिती सभेची मंजुरी प्रदान करुन योजनेनुसार कामाची अंतिम निवड यादी जिल्हा परिषदेमार्फत जिल्हा नियोजन समिती कडे मंजुरीस्तव पाठविण्यांत येत असुन यादीनुसार कामांना जिल्हा नियोजन समितीने मंजुरी प्रदान करणे अभिप्रेत आहे. तथापि, शासन निर्णय दिनांक १७ डिसेंबर, २०१४ मधील अ.क्र. ३ व ४ मध्ये नमुद तरतुदी प्रमाणे कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास येत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

त्यामुळे स्थानिक स्वराज संस्थेतील जि.प. सदस्यांना जिल्हा नियोजन समितीत नेमणुकीकरीता त्वरीत निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली.


निवेदन देतांना सर्वश्री जि.प.अध्यक्ष पंकज रहांगडाले, बांधकाम सभापती योपेन्द्रसिंह (संजय) टेंभरे, कृषी व पशुसंवर्धन सभापती रुपेश (सोनू) कुथे, जि.प.सदस्य प्रविण पटले, संदिप भाटीया, सौ. दिपा चंद्रिकापुरे, सौ. ममता वाळवे, सौ. रजनी कुंभरे, सौ.जयश्री देशमुख, कु. आनंदा बाडीवा,संदिप भाटिया, सी.चंद्रकला डोंगरवार, अँड.माधुरी रहांगडाले, जितेन्द्र कटरे, डॉ. लक्ष्मण भगत, रितेशकुमार मलगाम, सौ.उषा शहारे, सौ. राधिका धरमगुळे, सौ. विमल कटरे, सौ. अंजली अटरे, सौ. निशा तोडासे, किशोर महारवाडे, सौ.प्रिती कतलाम, सौ. लक्ष्मी तरोणे, चर्तभुज बिसेन, विजय उईके, सौ. कल्पना वालोदे, शैलेश नंदेश्वर, सशेन्द्र भगत, सौ. वंदना काळे, सौ. छाया नागपुरे, सौ.गिता लिल्हारे, सौ. छबुताई उके, सौ. कविता रंगारी, डॉ. भुमेश्वर पटले सौ. तुमेश्वरी बघेले, सौ. उषा मेंढे, सौ. वैशाली पंधरे, लायकराम मेंढे हे उपस्थित होते.

## प्रशासकीय अधिकार नसतांना ककोडीच्या एमओनी दिलेले पत्र

### जिल्हा परिषदेतील परिचर बदली प्रकरणात ककोडीच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचा पत्रव्यवहार संशयास्पद

**गोंदिया:-** जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागात कार्यरत परिचर पदावरील कर्मचारी नितीन रामटेके यांची प्रशासकीय बदली देवरी तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र ककोडी येथे झाली.तर ककोडी येथील आरोग्य केंद्रातील कार्यरत कर्मचारी शेंडे यांची बदली ही जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागात करण्यात आली. शेंडे हे ककोडी येथून कार्यमुक्त होऊन बदलीच्या ठिकाणी रुजू झाले. मात्र बदली होऊन एक महिन्याच्या वरील कालावधी लोटूनही बदलीच्या ठिकाणी रामटेके हे रूजू झाले नाही.दरम्यानच्या काळात याच आरोग्य केंद्रात २ ऑगस्टला एक कर्मचारी रुजू झाल्याची माहिती तेथील वैद्यकीय अधिकारी हे १७ ऑक्टोंबर २०२३ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.गोंदिया यांना पत्र देऊन परिचर नितिन रामटेके यांना अतिरिक्त होत असल्याचे कारण देत रुजू करता येत नसल्याचे पत्र दिले आहे.तर दुसकीकडे २ ऑगस्टला रूजू झालेल्या कर्मचारीची माहिती स्थानिक वैद्यकीय अधिकारी हे १९ ऑक्टोंबरला पत्राद्वारे कळवित असल्याने या आरोग्य केंद्रातील प्रशासकीय कारभार चव्हाट्यावर आलेला आहे.

विशेष म्हणजे ककोडी प्राथमिक आरोग्य केंद्राचे प्रशासकीय व आर्थिक कामकाजाचे अधिकार हे तालुका वैद्यकीय अधिकारी श्री कुकडे यांच्याकडे असतांना स्थानिक दोन्ही कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करीत तसेच प्रशासकीय अधिकार नसतांना व तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्या निदर्शनास सदर माहिती न आणताच जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाशी सरळ



प्राथमिक आरोग्य केंद्र ककोडी
तालुका- देवरी जिल्हा- गोंदिया

आरोग्य सेवा
ई-मेल phckakodideori@gmail.com

पत्ता:- प्राथमिक आरोग्य केंद्र ककोडी तालुका देवरी जिल्हा. गोंदिया

जा.क्र./ वै.अ/प्रा.आ.के. [illegible]
दिनांक [illegible] १९/१०/२०२३

प्रति,
उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सामान्य)
जिल्हा परिषद गोंदिया.

विषय:-प्रा.आ.केंद्र-ककोडी येथे स्त्री परिचर देण्याबाबत.
संदर्भ:- जा.क्र.ताआअ/आस्था/क.स/रिपमा/२८५/२२ दि.१७.१०.२२.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयांन्वये प्राथमिक आरोग्य केंद्र ककोडी पं.सं.देवरी येथे परिचर संवर्गाचे पुरुष परिचर-३ व स्त्री परिचर-१ असे आकृतीबंध मंजूर आहे.

सद्या प्राथमीक आरोग्य केंद्र ककोडी पं.स.देवरी येथे पुरुष परिचर-३ कार्यरत आहेत व स्त्री परिचर-१ हि जागा रिक्त असून प्रा.आ.केंद्र- ककोडी येथे महिला पेशंन्ट उपचार करिता येतात त्यांच्या मदती करीता स्त्री परिचर ची अतिआवश्यकता आहे. म्हणून प्राथमीक आरोग्य केंद्र-ककोडी येथे स्त्री परिचर देण्यात यावे. त्यामुळे श्री.नितीन रामदास रामटेके हे पुरुष परिचर अतिरिक्त होत आहेत करीता त्यांना सामान्य प्रशासन विभाग जि.प.गोंदिया येथे परत करण्यात येत आहे.

करीता माहितीस्तव अग्रेपित.

वैद्यकिय अधिकारी
प्रा.आ.केंद्र ककोडी

प्रतिलीपी:-
१) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.गोंदिया यांना माहितीस्तव सादर.
२) मा.जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.गोंदिया यांना माहितीस्तव सादर.
३) मा.तालुका आरोग्य अधिकारी ता.नि.प.देवरी यांना माहितीस्तव सादर.

-स्वा-
वैद्यकिय अधिकारी
प्रा.आ.केंद्र ककोडी

जिल्हा परिषद, गोंदिया (सामान्य प्रशासन विभाग)
4663
19 OCT 2023

पत्रव्यवहार केल्याने या आरोग्य केंद्रातील कामकाजाचा गोंधळ समोर आलेला आहे.

विशेष म्हणजे प्रशासकीय कामकाजाचे अधिकार नसतांना या दोन्ही वैद्यकीय अधिकारी यांनी स्वतःच्या हस्ताक्षराने दिलेले पत्र खरे की खोटं हा प्रश्न निर्माण झालेला असून ऑगस्ट मध्ये कर्मचारी रूजू झालेला असताना ऑक्टोंबरमध्ये माहिती देण्याचे कारण काय या कालावधीत ही माहिती का लपवली गेली असे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत.

सामान्य प्रशासन विभागातून ऑगस्ट महिन्यात बदली प्रकिया पार पडली. त्यानंतर २१ ऑगस्ट रोजी परिचर नितिन रामटेके यांना कार्यमुक्त करण्यात आले. पण सदर कर्मचारी त्या ठिकाणी रुजू होण्यास गेले की नाही हे अद्यापही प्रश्न कायम असून ते मधल्या काळात वैद्यकीय रजेवर गेलेले असताना रुजू होतांना त्यांनी वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करुन परत जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागात रूजू झाले की कुठल्या आधारावर ते रूजू होऊन हजेरीपत्रकावर स्वाक्षरी करीत आहेत असे अनेक प्रश्न ककोडी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी ज्यांना प्रशासकीय अधिकार नसतांना दिलेल्या पत्रामुळे गोंधळ उडालेला आहे.

सीईओ साहेब एकीकडे कुणाचीही तक्रार नसतांना आणि व्यवस्थित काम सुरु असतांना एका कर्मचाऱ्याची प्रशासकीयच नव्हे तर विनंती बदलीही झालेली नसतांना मुख्यालयात त्वरीत सेवासंलग्नता करुन घेत रुजू न झाल्यास कारवाईचा इशारा देतात.मात्र दुसरीकडे प्रशासकीय बदलीनंतरही सदर कर्मचारी महिना लोटूनही बदलीच्या ठिकाणी रूजू व्हायला टाळाटाळ करीत असतांना प्रशासन गप्प का अशा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## संपादकीय

### ड्रग्जमुक्त महाराष्ट्र करा; तरुण पिढीला वाचवा

ड्रग्ज, अमली पदार्थ, नशा! हे असे शब्द आहेत, ज्यामध्ये सध्याची अर्ध्याहून अधिक तरुणाई अडकलेलीस दिसते. ड्रग्जवर बंदी असतानाही देशभरातून ड्रग्जचे साठे मोठ्या प्रमाणात जप्त होताना दिसत आहेत. या ऑक्टोबर महिन्यात नाशिक रोड येथील एका गोदामावर धाड टाकून ५ कोटींचे एमडी व इतर रसायन जप्त करण्यात आले आणि पुन्हा एकदा ड्रग्जबाबतची चर्चा महाराष्ट्रात सुरू झाली. ड्रग्जमाफिया ललित पाटील याचा भाऊ भूषण पाटीलचा नाशिकमध्ये कारखाना होता. त्यानंतर या कारखान्यातून पोलिसांनी ३०० कोटी रुपयांचे मेफेड्रोन जप्त केले. या प्रकरणात कोणाकोणाचे लागेबांधे आहेत यावरुन राजकीय चिखलफेक झाली असली, तरी एवढा मोठा ड्रग्जचा साठा तयार केला जातो. याचा अर्थ मागणी तसा पुरवठा या तत्तवानुसार ड्रग्जला तरुणाईकडून मोठी मागणी आहे ही बाब लपून राहिलेली नाही. त्याचबरोबर या ड्रग्जच्या अतिसेवनामुळे गुन्ह्यांचे प्रमाणही वाढत चालले आहे, अशी पोलिसांची माहिती आहे.

अमली पदार्थांच्या विळख्यात तरुण सहजपणे फसतात. एकदा का अमली पदार्थांची चटक लागली की, ती सवय बनायला वेळ लागत नाही. अमली पदार्थांचा प्रसार रोखला नाही, तर आपली अख्खी एक पिढी उद्ध्वस्त होऊ शकते. कोणत्याही दुष्परिणामांची आणि मृत्यूची फिकर विसरायला लावणाऱ्या अमली पदार्थांचे सेवन सतत केल्याने अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. ज्या पदार्थाच्या सेवनाने माणसाला विशिष्ट प्रकारची सुस्ती, नशा किंवा धुंदी येते, त्यांना अमली पदार्थ म्हणतात. अफूपासून मोर्फिन, हेरॉइन आदी नशिले पदार्थ तयार केले जातात. कोकेन, भांग, गांजा, चरस यांचा मादक पदार्थांमध्ये समावेश होतो. तरुणाईला अमली पदार्थांच्या नशेचे आकर्षण वाटण्याचे पहिले कारण म्हणजे त्यांचा वयोगट. तारुण्याच्या या काळामध्ये काही तरी थ्रिलर करावे, अशी इच्छा खूप प्रबळ बनलेली असते. लोकांमध्ये आपले आकर्षण वाटावे यासाठी अनेक तरुण थ्रिलर गोष्टी करताना दिसतात. अशा थ्रिलिंगची प्रचंड क्रेझ असणाऱ्या वयात शरीरामध्ये एखादा अमली पदार्थ गेल्यास आपण जगापेक्षा कुणीतरी वेगळे आहोत, अशी भावना या तरुणांमध्ये निर्माण होते. भारतात अमली पदार्थाच्या विळख्यात १४ ते २२ वयोगटांतील तब्बल ४० टक्के तरुण असल्याची आकडेवारी पुढे येते.

नव्या अघोरी आनंदाच्या शोधात असणारे गर्भश्रीमंत, निराशा व वैफल्यग्रस्तता विसरण्याचा मार्ग शोधण्याच्या प्रयत्नात असलेले, मध्यमवर्गीय-गरीब युवक अमली पदार्थांच्या सेवनाच्या जाळ्यात ओढले जातात. अशा युवकांना पुन्हा योग्य मार्गावर आणणारा नातेवाईक व मित्र मिळाला नाही, तर त्यांचे जीवन वाया जाते. तरुणांना या जाळ्यातून बाहेर काढण्यासाठी नागपूर शहरात एक वर्षापूर्वी गुन्हे शाखा विभागामार्फत विशेष मोहीम राबविली गेली. पोलीस प्रशासनाद्वारे उपाययोजना करण्यात आल्या. याबाबत राज्य व जिल्हास्तरीय समिती सुद्धा गठित करण्यात आली. त्यात पोलीस विभागासह महसूल, वन, सीमा सुरक्षा, राज्य उत्पादन, पोस्ट विभाग व अन्न व औषध विभागाचा समावेश होता. नागपूरप्रमाणे नंदूरबार जिल्हा पोलीस प्रशासनाने जिल्हा अमली पदार्थमुक्त व्हावा यासाठी जी पावले उचलली आहेत ती स्वागतार्ह आहेत. राज्यातील अन्य शहरांतील पोलीस प्रशासनाने याकडे प्राधान्याने लक्ष देण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे, ड्रग्जच्या आहारी गेलेल्या मुलांना बाहेर काढण्यासाठी कुटुंबातील सर्वच सदस्यांनी अशा वेळी मुलाच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले पाहिजे. त्याला विश्वासात घेतले पाहिजे. प्रेमाने, समजूतदारपणे या आजारातून त्याला बरे होण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. समुपदेशक, व्यसनमुक्ती इच्छुक समूह, वैद्यकीय तज्ज्ञ अशा टीमची निर्मिती करुन आठवड्यातून एकदा समूह चर्चा करण्यासाठी मदत केंद्रे उभारली जाणे आवश्यक आहे. समाजाने अशा मुलांची अवहेलना न करता त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहायला हवे. मुलांना दलदलीत न ढकलता हात देऊन खेचून त्यातून बाहेर काढायला पाहिजे. पंचकर्म, रसायन, वनौषधी यांचा व्यसनमुक्तीत वापर करुन घ्यायला हवा. हॉलिस्टिक विचार महत्त्वाचा आहे. परिपूर्ण चिकित्सेचा शोध घ्यायला हवा.

समाजातून अमली पदार्थांच्या पुरवठ्याला प्रतिबंध घातला पाहिजे. त्यासाठी नार्कोटिक ड्रग्ज ॲण्ड सायकोट्रॉपिक सबस्टन्स ॲक्ट यासारख्या अमली पदार्थ विरोधी कायद्याची कठोर अंमलबजावणी व्हावी. यावरती औषधे आहेत. मात्र व्यसन हे न सांगता किंवा लपवून दिलेल्या औषधाने सुटत नाही. याचे कारण म्हणजे प्रत्येक व्यक्तीचे व्यसन वेगळे असू शकते. त्याचबरोबर आपली युवा पिढी व आपली जवळची माणसे या अमली पदार्थाच्या विळख्यापासून दूर राहावीत यासाठी प्रत्येक जबाबदार नागरिकाने शासनास सहकार्य तर केलेचे पाहिजे आणि जनजागृतीसाठी प्रत्येकाने आपला सहभाग देणे, ही काळाची गरज आहे.

## दत्तोरा येथील विद्युत समस्या तात्काळ सोडवा

### अन्यथा आंदोलन करु, गावकऱ्यांचा इशारा



**गोंदिया:-** मागच्या अनेक दिवसापासून गावातील विद्युत पुरवठा मोठ्या प्रमाणात लपंडाव करीत आहे. त्यात अनेक तासन्तास विद्युत पुरवठा बंद राहणे ही नित्याचीच बाब झाली आहे. अनियमित विद्युत पुरवठ्यामुळे गावकरी व येथील शेतकरी त्रस्त झाले आहेत. सदर विद्युत पुरवठ्याची समस्या तात्काळ सोडवा अन्यथा आंदोलन करूअसा इशारा गोंदिया तालुक्यातील दत्तोरा येथील नागरिकांनी व शेतकऱ्यांनी दिला आहे.

येथील लोकसंख्या जवळपास दोन हजाराच्या वर असून येथे जवळपास पाचशे च्या वर मीटर धारक आहेत. त्यातही मोठ्या प्रमाणात शेतकरी वर्ग आहे. असे असले तरी येथे विद्युत पुरवठ्याचा मोठा खेळ खंडोबा नेहमीच सुरू असतो. अनेक तासनतास विद्युत पुरवठा बंद राहणे हे येथे नित्याचीच बाब झाली आहे. सदर प्रकार मागच्या अनेक महिन्यापासून अविरत सुरूआहे.या संबंधात अनेक तक्रारी येथील गावकऱ्यांनी व शेतकऱ्यांनी महावितरण कडे केल्या आहेत.

मध्यंतरी गावकऱ्यांचे शिस्तमंडळ सुद्धा महावितरणच्या कार्यालयावर धडकले होते. असे असले तरी अद्यापही महावितरण ने सदर समस्या सोडविण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाही. सध्या शेतकऱ्यांचे धान पीक अंतिम टप्प्यात असून त्यास पाण्याची नितांत आवश्यकता आहे. अशा परिस्थितीतही विद्युत पुरवठा लपंडाव करीत असल्यामुळे येथील शेतकरीवर्ग हवालदिल झाला आहे.

सदर समस्या सोडविण्यासाठी येथील गावकऱ्यांनी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधीनाही साकडे घातले परंतु समस्या मजैसे थेफच्या स्थितीतच आहे. या संबंधात रावनवाडी येथील महावितरणचे कनिष्ठ अभियंता यांच्याशी भ्रमणध्वनीवरुन संपर्क साधला असता त्यांनी प्रत्युत्तर दिले नाही. सदर समस्या तात्काळ सोडवुन गावातील विद्युत पुरवठा नियमित करावा अन्यथा आंदोलन करू असा इशारा येथील गावकऱ्यांनी व शेतकऱ्यांनी एका प्रसिद्धी पत्रकातून दिला आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)

# बेरोजगारीचा एव्हरेस्ट "भारतीय तरुणाईचे कंत्राट"

सरकारी नोकऱ्यांचे कंत्राटीकरण, शाळांचे कंपनीकरण (दत्तक विधान), तसेच सरकारी संस्थांचे खाजगीकरण सुरू असतांनाही तरुणांना याची तमा नाही. स्वतःच्या भवितव्या बाबतची त्यांची बेफिकिरी आयुष्य उध्वस्त करणारी ठरत आहे. सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे वर्तमानात बेरोजगारी एव्हरेस्ट गाठत चालली आहे.

स्पर्धा परीक्षांची जीवघेणी स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी जीवन मरणाची लढाई बनली. दिवस रात्रीच्या अभ्यासाने डोळे खोबनित गेलेले, गाल खोल, पोटाचं चिपाड झालेलं, शरीर हललेलं, निस्तेज चेहरा, मनात भवितव्याची चिंता अशी शारीरिक, मानसिक स्थिती भारताचे भवितव्य असलेल्या तरुणांची झालेली आहे. नोकरभरती नाही, झाली तर अत्यल्प प्रमाणात, वेळेत परीक्षा नाही, निकालास अतिविलंब, त्यात पेपर फुटी यामुळे विद्यार्थी-पालक कमालीचे त्रस्त आहेत.

वर्ग एकच्या (Class one) मोजक्या जागा असतात. त्यातही सेवानिवृत्त उच्चपदस्थ अधिकारी यांना महत्त्वाच्या जागांवर अलिकडे परत संधी दिल्या जात आहे. UPSC च्या जागा परस्पर भरल्या जात आहेत. कठोर प्रयत्न करुनही नवतरुण त्यापासून वंचित होत आहे. त्यामुळे चपराशी, चौकीदार, तलाठी, पोलीस, ग्रामसेवक, लिपिक, शिक्षक अशा तृतीय, चतुर्थ श्रेणी पदासाठी इंजिनियर, डॉक्टर, पीएचडी, एमबीए, नेट सेट, एमएड, एमएससी, एमकॉम, एमफिल, एमलिफ, एमसीए झालेले बेरोजगार लाखोंच्या संख्येने स्पर्धेत आलेत. उच्च शिक्षितांच्या या अवमूल्यनास सरकारात बसलेले नाकर्ते पुढारी जबाबदार ठरतात.

वर्ग २,३,४ चे कर्मचारी ११ महिन्याच्या कॉन्ट्रॅक्टवर नियुक्त केले जात आहे. सरकारी दवाखान्यात ७०% डॉक्टर कंत्रांटी आहेत. ईतर सर्वच शासकीय कार्यालये, बँका, महावितरण, महामंडळे येथे रोजंदारीवर उच्चशिक्षित तरूण अत्यल्प पगारावर काम करतात.

मायबाप हाडाची काड आणि रक्ताचं पाणी करून मुलांना शिकवितात. त्यांच लहानस स्वप्न असतं. मुलगा शिकेल, नोकरी लागेल, सुखाचे चार घास म्हातारपणात मिळतील. परंतू वास्तव ईतकं भयाण आहे की या सुशिक्षित मुलांना आजही शेतात राबून, मजुरी करुन मायबाप खाऊ घालतात. डोळसपणे बघितल्यास याची असंख्य उदाहरणे आपल्याच आजूबाजूला दिसतील. आधी कष्टानं व आता लेकरांच्या नोकरी व लग्नाच्या काळजीनं खंगुन (गर्भगळीत झालेले) गेलेले हे भारतीय कष्टकरी चाळिशीतच म्हातारे दिसायला लागलेत.

हक्काचा रोजगार पध्दतशीरपणे काढून घेतला जात असतांना, युवाशक्ती मात्र कपाळावर हात ठेऊन बसली आहे. त्यांच्या धमण्यातील रक्त ईतके थंड कसे असा प्रश्न पडतो. सोशल मीडियाच्या आभाशी दुनियेत रमलेल्या तरुणांनी त्यातून बाहेर निघून रोजगारासाठी एल्गार पुकारावा. आणि या दुरावस्थेचा सत्ताधाऱ्यांना जाब विचारावा. एवढे शिकूनही आम्हाला रोजगार का नाही?, आमच्या भविष्याचे काय?, साऱ्यांचे कंत्रांटीकरण तर राज्यकर्ते सरकारी का? तुम्ही सेवा म्हणून राजकारण करता तर पगार व पेन्शन का घेता?, स्वतःच्या चैनीसाठी जनतेच्या पैशाची लूट का करता? दहा वर्षापूर्वे खटारा स्कूटरवर फिरणारे राजकारणी स्वतःच्या चार्टर प्लेनचे, १० गाड्यांचे, ५ बंगल्यांचे, ५० शाळांचे, १५ कारखान्यांचे, शेकडो एकर जमिनीचे मालक कसे? अधिकारी वर्गाला पण विचारा, केवळ पगाराच्या भरवशावर एव्हढी गडगंज संपत्ती कमाविण्याचे तंत्र काय? जे प्रश्न तुमच्या मनाला पडेल ते सारे प्रश्न जोपर्यंत लोकप्रतिनिधींना विचारणार नाही तोपर्यंत आपल्या पोटावर, पाठीवर रट्टे पडायचे थांबणार नाही. आपला बाप धुऱ्यावर आणि सैनिक सिमेवर मरतच राहणार. हे थांबावे यासाठी तरुणांनी नवक्रांतीची मशाल व्हावे. भ्रष्ट सारे नष्ट व्हावे. ही अंतरीची प्रार्थना आहे.

कौन कहता हैं, आसमान मे सुराग नहीं होता.

एक पत्थर तो, तबीयत से उछालो यारो.

सरकारने आता खाजगी ठेकेदारां मार्फत नोकरवर्ग उपलब्ध करून घेण्याचा घाट घातला आहे. आरक्षण संपूर्णतः संपविण्याचे षडयंत्र रचले गेले आहे. कंत्राटी कर्मचारी ठेकेदाराचे असतील. काम सरकारचे करतील. राजकीय नेत्यांचे बगलबच्चे, लाचार निष्ठावंत मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, नागपूर या महाराष्ट्राच्या औद्योगिक वसाहतीत सुरक्षा कर्मचारी भरतीचे अड्डे सांभाळत आहेत. हीच स्थिती अलीकडच्या काळात इंजिनियर, डॉक्टर, प्राध्यापक, शिक्षक, पोलीस, वा तत्सम नोकऱ्यांची करणार आहे. पुढाऱ्यांच्या चमच्यांच्या कंपन्यांना ही कंत्रांटे मिळणार. कर्मचारी तुटपुंज्या पगारावर नेमले जातील. त्यांनी किमान वेतन विचारायचे नाही, रजा नाही, सोई नाही, संरक्षण नाही. कायमस्वरूपी नोकरी नसल्याने शासनमान्य बँकाही कर्जासाठी त्यांना दारात उभे करणार नाही. परिणामी अशा कंत्राटी भरतीमुळे उत्तरदायित्वाची तसेच विश्वासार्हतेची भावना कमी असू शकते. त्यांची सरकार प्रती बांधिलकी नसल्याने गोपनीयता राहू शकत नाही.

सद्य स्थितीत राज्य सरकारच्या विविध विभागात एक लाखावर पदे रिक्त आहेत. ही सर्व पदे कंत्राटी पद्धतीने भरण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. राज्य सरकारच्या चार विभागात ११ हजार २०३ पदे भरण्याची प्रक्रिया सुरू देखील करण्यात आली आहे.

संविधान सभेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या भाषणात म्हटले होते लोकशाहीच्या चार स्तंभातील शासन-प्रशासन हा महत्वाचा स्तंभ आहे. पारदर्शी कारभार चालवून लोककल्याणकारी राज्याची कल्पना प्रत्यक्षात उतरवण्याची जबाबदारी शासनकर्त्यांची असते. घटना कितीही चांगली असली आणि ते राबविणारे लोकप्रतिनिधी जर योग्य नसतील तर त्यातून जनकल्याण साधणार नाही. भारतीय राज्यघटनेनुसार शासन चालविणे व त्याची व्यवस्था उभी करणे सरकारचे आद्य कर्तव्य आहे. समर्पित भावनेने राज्य कारभार चालविल्यास ती व्यवस्था समाजाला दिशा देणारी व समाजाचे हित साधनारी ठरते.

मात्र इथे तर सरकारच खरेदी विक्री संघ बनू पाहत आहे. सरकार चालवणे म्हणजे दुकान किंवा उद्योग चालविणे नव्हे. प्रत्येक योजनांतून टक्केवारी खाऊन स्वतःच्या शंभर पिढ्यांची सोय करणारी ही राजकीय प्रवृत्ती नष्ट व्हायला हवी. अतोनात पैसे खर्च करुन खासदारकी, आमदारकीच्या आडून निर्माण झालेले हे नवे वतनदार, शिक्षणसम्राट आणि भांडवलदार देश हितासाठी फार घातक बनत चालले आहे.



महाराष्ट्रातील पहासष्ट हजार सरकारी शाळांचा लिलावही सरकारने नुकताच मांडला आहे. महात्मा जोतिबा फुलेंना अपेक्षित, शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणास मूठमाती दिल्या जात आहे. गोरगरिबांच्या हक्काच्या शाळांचे जाहीर दत्तक विधान करण्याचा निर्णय सत्ताधाऱ्यांनी घेतला. शाळेला नाव देण्यासाठी शहरांच्या दर्जानुसार ३ कोटी, २ कोटी, पन्नास लाख. शाळा चालविण्यासाठी ज्या कंपन्या CSR फंड (सामाजिक निधी) जास्त देतील त्यांना शाळा दत्तक दिल्या जातील. सरकारी शाळांचे खाजगीकरण करण्याचे हे दुष्ट पाऊल नव्या वामणाने टाकले आहे. भविष्यात हया कंपन्यांचे मालक व सत्ताधारी यांच्यात खोक्यांची डील होऊन मोक्याच्या ठिकाणच्या साऱ्या जागा ताब्यात घेतल्या जातील. मॉल बांधतील. शिक्षणाचे बाजारीकरण करतील. नफेखोरी एवढाच त्यांचा उद्देश असतो. समाजाचे हितरक्षण त्यांची सुरक्षितता हे शब्द त्यांच्या डिक्शनरीत नाहीच.

सरकारला खरेच जनभावनेची कदर असेल तर कंपण्याकडील उड्ठ फंड शासनाच्या गंगाजळीत जमा करून घ्यावा. न दिल्यास स्वतः शिक्षणावरील बजेट वाढवून शाळांना उत्तम सोई सुविधा पुरवाव्यात. स्वातंर्त्याची पंचाहत्तरी होऊनही शाळांच्या ईमारती निकृष्ट आहेत. शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय नाही, बेंच तुटलेले आहेत. प्रसाधन व्यवस्था खराब आहे. शाळेत, वर्गात व मुलांच्या दप्तरात साप निघतात. काही संरक्षण नाही. खिचडीत पौष्टिक साहित्य नाही, चपरासी नाही. चार वर्गांना एक शिक्षक अशी दयनीय अवस्था आहे. डिजिटल खोल्या नाही. खेळांचे साहित्य नाही, शिक्षकांना भरमसाठ अशैक्षणिक कामे लादली जातात. पन्नास हजारावर शिक्षक कमी आहेत. ग्रामीण शिक्षणाचा सारा बट्ट्याबोळ लावला आहे.

दिल्ली, केरळ, आसाम, पंजाब सरकार जशी शैक्षणिक क्रांती घडवू शकले तसे महाराष्ट्रातही व्हावे. स्वतःच्या खाजगी संस्था चकाचक आणि सरकारी शाळांचे उकिरडे हे कसे धोरण आहे? डॉ पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील ह्या शिक्षण महर्षींनी शिक्षणाची गंगा सर्वसामान्यांसाठी निर्माण केली. स्वतः जवळचे सारे संपल्यावर पत्नीच्या गळ्यातील दागिने मोडून शिक्षण संस्था चालविल्या. यांच्या असीम त्यागातून काही धडा न घेता आताच्या शिक्षणसम्राटांनी शिक्षणाचे व्यावसायिकरण केले. यांच्या महागड्या संस्थेत प्रवेश घेतांना बापाला मायच्या गळ्यातील दागिना विकून पोराची फी भरावी लागते. ह्या गगनचुंबी शिक्षणसंस्था पुढाऱ्यांची व त्यांच्या पोरांची चरायची कुरणे झाली आहेत.

प्रत्येकाला उत्तम दर्जाचे शिक्षण मोफत देऊन वंचितांना मुख्य प्रवाहात आणणे हे महत्वाचे कर्तव्य सरकारचे आहे. मात्र सरकार संविधानातील समान संधीला व शिक्षण हक्क कायद्याला हरताळ फासत आहे. गोर गरिबांच्या मुलांच्या शिक्षणासाठी पैसा नाही म्हणणे हा सरकारचा दुष्ट हेतू होय. कर्मचाऱ्यांचा पगार तेव्हढा मोजून चालणार नाही. मुले जिथे विद्याग्रहन करतात तिथे सुविधापूर्ण वातावरण देखील निर्माण करावे लागेल.

ओरिसाचे मुख्यमंत्री नविन पटनायक यांनी सत्तावन्न हजार (५७००० हजार) कंत्रांटी कर्मचाऱ्यांना कायम स्वरूपी नोकरी देण्याचा महत्वाकांक्षी निर्णय घेतला. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीतील विद्यार्थ्यांनसाठी KG Vo PG पर्यंतचे शिक्षण मोफत केले. अद्ययावत शाळा निर्माण केल्यात. UPSC करणाऱ्यां विद्यार्थ्यांना कोचिंग फ्री व विदेशात शिक्षणासाठी जाणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना लागणारा शैक्षणिक खर्च देण्याचे धोरण राबविले. दिल्लीचे शिक्षणावरील बजेट देशात सर्वात जास्त आहे. हे तिथे शक्य आहे तर साधन संपत्तीने समृद्ध असलेल्या, भरमसाठ कर वसूल होणाऱ्या महाराष्ट्रात का होऊ नये?

आपण दर्जेदार शिक्षणासाठी, रोजगारासाठी, जनगणनेसाठी, आरक्षणासाठी लढतो. संघर्षातच आयुष्य जाते. पण हे निकदरे, धंदेवाईक सरकार साऱ्या संस्था विकून तरुणाईच्या हातात धुपारने देत आहे.

भारतात बेरोजगारी, भुकमरी, आत्महत्या, धार्मिक कलह वाढलेत. भाषण स्वातंर्त्यावर, लिखाण स्वातंत्र्यावर गदा आली. सर्वत्र भीतीचे वातावरण निर्माण झाल्याने मने अस्वस्थ झालीत. अशा वातावरणात देश महासत्ता कसा होईल?

झोपडपट्टीतील रोगराई, दवाखान्यात औषधी अभावी रोजचे मरण, सीमेवर सैनिकांना पुरविली जाणारी बोगस शस्त्रास्त्रे, शेतकऱ्यांना मिळणारे बोगस बियाणे, कामगारांचे होणारे शोषण हेच अच्छे दिन का? दोन कोटी वर्षाला रोजगार, शेतकऱ्यांचे दुप्पट उत्पन्न, १५ लाख प्रत्येकाच्या खात्यात, मोफत शिक्षण हया साऱ्या खोट्या आश्वासनांचे फोटो फ्रेम करून घरात लावावे आणि कँडल लाऊन महाआरती करावी की थाळी वाजवून नाचावे म्हणजे अच्छे दिन दिसतील?

शासनाने बेरोजगारी भत्ता वाढविण्यापेक्षा हाताला काम द्यावे. शेतकऱ्यांना दोन हजार रुपये सन्मान धन देण्यापेक्षा शेतमालाला भाव द्यावे. आनंदाचा शिधा वाटण्यापेक्षा घराघरात रोजगार द्यावा. स्वतःच्या कमाईने शिधा आणून कुटुंब जगविण्याची हिम्मत द्यावी. देशाचा हॅपीनेस इंडेक्स वाढला तर देश नक्कीच महासत्ता बनेल.

सध्या सत्ताधीशांना सत्तेची धुंदी चढली आहे. आपलं कुणी वाकडं करू शकत नाही, या मस्तीत सारे वावरत आहे. जातीजातीत कलह, धर्मद्वेष, दंगली हे सहज सत्ता प्राप्तीचे खेळ बनले. तरुणांची माथी भडकवून राजरोसपणे हे सारे सुरू आहे. अशी फसवाफसवी करून तरूण पिढीची क्रयशक्ती नष्ट केली जात आहे. सातत्याने मूळ मुद्यापासून लक्ष विचलीत व्हावे असे फासे फेकले जात आहे. कधी स्मारकासाठी गावोगावची माती गोळा करुन, कधी विटा गोळा करुन तर कधी वाघनखांचे प्रदर्शन भरवून भंडवले जात आहे.

छत्रपती शिवाजी राजांनी त्यांच्या तारुण्यात अफजलखानाच्या पोटात वाघनखे घालून दुष्ट, अन्यायी प्रवृत्तीचा वध केला. रयतेला सुरक्षित केले. आता तरुणाईने राजांची ती शिकवण अंगिकारुन देशात वाढलेली जुलमी भ्रष्ट प्रवृत्ती नष्ट करावी. देशाला सुरक्षित करावे.

आपण मजूर, कामगार, कास्तकाराची पोरं ऐन उमेदीत पांढरा, हिरवा, निळा, भगवा, लाल, पिवळा झेंडा हातात घेऊन नाचतो. मोर्चात जातो, घोषणा देतो, दंगलीत तलवारी उपसतो, लाठ्याकाठ्या मारतो आणि मरतोही. कधी मंर्त्याची, खासदारांची, आमदारांची व अधिकाऱ्यांची पोरं आपण बघितली का मोर्चात, तुरुंगात, मंदिर, मस्जिदीच्या वादात? नक्कीच नसेल! कारण ती ऑक्सफर्ड, केंब्रिज, न्यूयॉर्क, कोलंबिया मधे शिकत असतात. कॅनडा, जपान, अमेरिका, इंग्लंडमधे उद्योग करीत असतात. किंवा लाभाच्या मोठ्या शासकीय पदावर सत्ता गाजवीत असतात. आता तुम्ही थोडे थांबा. पुढाऱ्यांच्या पोरांना काही काळ झेंडे नाचवू द्या, मोर्च्यात जाऊ द्या. जेल वारी घडू द्या. बघा कसे शिस्तीत येतील.

केंद्र सरकारच्या घोषणापत्रात २५ करोड रोजगार निर्मितीचा वादा आहे. मात्र बेरोजगारी दर दिवसागणिक वाढत आहे. लेबर ब्युरो नुसार बेरोजगारी दर ३% वरुन ७% झाला आहे. खरे तर बेरोजगारी गणना केली तर हा आकडा यापेक्षाही भयावह येईल. बहिऱ्या सरकारला सांगा भुके भजन न होय गोपाला!

स्किल इंडियावर १२ हजार करोड खर्च केलेत. यातून १२% देखील रोजगार निर्मिती झाली नाही. प्रत्येक वर्षी ५ लाख इंजिनिअर बनतात मात्र दीड लाखांना देखील रोजगार मिळत नाही. टेक्निकल ग्रॅज्यूएटची ही स्थिती आहे तर नॉन टेक्निकलचे हाल काय असतील. मेक इन इंडियाचा नारा लावायचा आणि विदेशी कंपन्यांना कंत्रांटे द्यायची. गुजरात मधील सरदार पटेल यांच्या Statue Of Unity स्मारकाचे काम व नागपूर मधील महामेट्रोचे काम चिनी कंपन्यांना दिलीत. हे कोणते मेक इन इंडिया. डिजिटल इंडिया सोईनुसार फिजीकल होतो. आणि स्टँडअप इंडिया राज्यकर्त्यांच्या ईशाऱ्यावर ऊठबस करतो.

महान अर्थशास्त्रज्ञ थॉमस पिकेटी म्हणतात "भारत ब्रिटिश राज से कॉपिरेटर राज की तरफ जा रहा हैं'. देश इस तरह बदल रहा है. ब्रिटिश राजवटीतील जे जासुस होते ते आता कॉपिरेटर युगाचे भोपू बनले आहेत. ज्यांचा उद्देश फक्त नफेखोरी व लूट एवढाच आहे. सरकार अशा लुटारू भांडवलदारांना कडेवर घेऊन फिरतात. त्यांची अरबो-खरबोची कर्जे माफ करतात. आणि मग रिटर्न गिफ्ट म्हणून निवडणुकांसाठी भरमसाठ चंदा घेतात. नीतिमत्ता, सभ्यता, आणि विवेक याच्याशी सत्ताधाऱ्यांचा दुरान्वयानेही संबंध राहीलेला दिसत नाही.

बेरोजगारी, महागाई व गरिबी एव्हरेस्ट सर करीत आहे. इन्फोसिस, महिंद्रा, टीसीएस, रिलायन्स, अदाणी सारख्या अनेक मोठ्या कंपन्या कर्मचारी कपात करीत आहेत. सरकारी संस्थाची विक्री सुरू आहे, शाळांचे कंपनीकरन सुरू झाले, लाखो रिक्त पदांची भरती करायची नाही. हे असेच होत राहीले तर बेरोजगारी लवकरच महामारीचे रुप धारण करेल. जेव्हा देशातील तरूण अशा महामारीने ग्रासतात तेव्हा ते बेभान होतात. देशांत असंतोष माजतो. देशाची विकसीत राष्ट्र बनण्याची प्रक्रिया मंदावते. जगातला सर्वात तरूण देश आज सर्वात जास्त बेरोजगारीचा देश बनण्याकडे वाटचाल करीत आहे. याची खंत सर्वांनाच वाटते.

भारतीय मातीचा डीएनए थोडा समजून घ्या. येथील कष्टकऱ्यांची बेरोजगार मुलं काम मागणारी आहेत. घामाच्या बदल्यात दाम मागतात. फुकटात भारतीयांना आनंदाचा शिधाही गोड लागत नाही. सच्चाई, ईमानदारी, नेकी, धैर्य, विवेक, करुणा, शांती या मातीची देन आहे. ही भूमी संतांची, सुधारकांची व क्रांतिकारकांची आहे. गांधी-आंबेडकरांना या देशाचा डीएनए कळला होता म्हणून त्यांच्या कृतीत आणि उक्तीत गरीब, शोषित, पीडित व कष्टकरी या शेवटच्या घटकांचा विचार प्रथम होता. हा विचार आधुनिक पुढाऱ्यांनी समजून घ्यावा व आचरणात आणावा. जर आम्ही भारताला महासत्ता बनवू पहात असू तर देशातील तरुणांसाठी रोजगार निर्मिती अजेंड्यावर घ्यावी लागेल. कोणतेही सरकार तरुणांच्या उज्वल भविष्यासाठी त्यांच्या हाताला काम देण्याची आपली जबाबदारी झटकू शकत नाही. देशांतील बेरोजगारांची मोठी समस्या ही आहे की शिक्षणाच्या दर्जा नुसार त्यांना काम मिळत नाही. पकोडे तळण्यातही काही कमीपणा नाही. आम्ही ते करुच. आणि करतोही. पण इंजिनीअर, वकील, डॉक्टर, एमबीए, एमएससी झालेली मुले पकोडे तळतील, चहा विकतील तर देशाची शोभा निघेल. त्यांना त्यांचा आत्मसन्मान विकायाला लावू नका. पुढच्या पिढीला वाटेल शिकून पकोडेच तळायचे तर कशाला शिक्षण घ्यायचे. शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगार उपलब्ध करुन देणे सरकारचेच काम आहे. हे का विसरलात. लोक सरकारला मते देतात कामासाठी, रोजगारासाठी, आरोग्य, शिक्षण, प्राथमिक सोईसुविधा व सुरक्षेसाठी. मंदिर-मस्जिद, हिंदू-मुस्लिम, जात-धर्माच्या दंगलीपेक्षा युवकांना रोजगार द्या.

तरुणांनो, आपण आपली बेफिकिरी वृत्ती सोडा. स्वतःची फिकीर करा. देश उध्वस्त होऊ नये म्हणून, देशांतील ज्वलंत प्रश्नाकडे लक्ष घाला. सोशल मीडिया व डीजेचा तालातील तल्लीनता थोडी बाजूला करुन आपली टाळकी ठिकाणावर आणा. आपण कर्तृत्ववान आहात. नुसते टाळ आणि टाळ्या पिटत बसू नका. आपल्यातील प्रचंड ऊर्जा सकारात्मक कार्यात लावा. स्वतःच्या उद्धारासाठीचा हा लढा बेंबीच्या देठापासून स्वतःच लढा. लाथ माराल तिथून पाणी काढाल ही शक्ती तुमच्यात आहे. आपण दैदिप्यमान भारताचे भविष्य आहात. देश तुमच्या समर्थ खांद्यावरच महासत्ता बनण्याचे स्वप्न बघतो आहे.

हो अंधेरी रात फिर भी,<br>
रोशनी की बात कर.<br>
अंतरीच्या या दिव्याला,<br>
काळजाची वात कर.

**बेरोजगारांचा रोजगारासाठी निर्धार**

कंत्रांटीकरण हटवा बेरोजगार वाचवा.<br>
शाळांचे कंपनीकरण हटवा शिक्षण वाचवा.<br>
सरकारी संस्थांची विक्री थांबवा आरक्षण वाचवा.<br>
खाजगी क्षेत्रातही आरक्षण द्या.<br>
रोजगार नही तो सरकार नही.<br>
जातीय जनगणना नही तो सरकार नही.<br>
भारतमाता की जय!

**हरिश पुंडलिकराव कुडे**<br>
**जवळा, ता.आर्णी, जी.यवतमाळ**<br>
**९८५०३०११३४, ८८३०२५४२४०**

## खा.पटेलांच्या प्रयत्नाने ६ माजी मालगुजारी तलावांचा होणार कायापालट

**गोंदिया:-** जिल्हातील सडक अर्जुनी व मोरगाव अर्जुनी तालुक्यातील माजी मालगुजारी तलावांची दुरुस्थी व खोलीकरण व्हावे अशी मागणी दोन्ही तालुक्यातील नागरिकांची होती. त्या मागणीला अनुसरुन पाटबंधारे विभागानी प्रस्ताव तयार केले या प्रस्तावांना मंजुरी मिळावी म्हणून माजी आमदार राजेंद्र जैन व जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर यांनी हा विषय खा. प्रफुल पटेल यांच्या निदर्शनास आणून दिला. खा. प्रफुल पटेल यांनी सदर विषय राज्याचे वित्तमंत्री ना.अजितदादा पवार यांच्याकडे ठेवला.

तात्काळ मा.वित्तमंत्र्यांनी नागपूर पाटबंधारे मंडळाचे कार्यकारी संचालक यांच्या कडे पाठवून मंजुरी प्रदान करावी असे निर्देश दिले आणि शेवटी सुमारे ५ कोटी रुपये खर्चाच्या खोडशिवानी, मलेजुगा, गिरोला, खाडीपार, कोसमतोंडी व अर्जुनी मोरगाव तालुक्यातील मोरगाव या तलावांचे दुरुस्थी व खोलीकरणाच्या कामाला विदर्भ पाटबंधारे विकास मंडळांनी मंजुरी प्रदान केली आहे.



सडक अर्जुनी तालुक्यातील खोडशिवनी, कोसमतोंडी, गिरोला, मालेजुंगा, खाडीपार, अर्जुनी मोर तालुक्यातील मोरगाव या माजी मालगुजारी तलावांचे दुरुस्थी व्हावी अशी त्या क्षेत्रातील शेतकऱ्यांची मागणी होती. खोडशिवानी, तलावाची लागवडी योग्य क्षेत्र २४६ ,मलेजुगा तलावाचे लागवटी क्षेत्र १६४ .. व सिंचन क्षेत्र १४६ .... ,गिरोला तलावाचे लागवटी योग्य क्षेत्र १५७ .. व सिंचन क्षेत्र १३७ ... खाडीपार तलावाचे लागवटी योग्य क्षेत्र १२२ ... व सिंचन क्षेत्र ११०... , कोसमतोंडी तलावाचे लागवटी योग्य क्षेत्र २६१ .. व सिंचन क्षेत्र २१० ... व अर्जुनी मोरगाव तालुक्यातील मोरगाव तलावाचे लागवटी योग्य क्षेत्र २५९.. व सिंचन क्षेत्र १७९ ... हे सर्व आकडे पाहता या माजी मालगुजारी तलावा पासून सिंचन क्षमता कमी झाल्याचे लक्षात येते. त्यासाठी या तलावातील गाळ काढणे व दुरुस्थी करणे जरुरीचे होते. त्यामुळे या तलावांच्या दुरुस्थीचे प्रस्थाव शेतकऱ्यांच्या मागणी नुसार तयार करावे अस्या सूचना खा. प्रफुल पटेल यांनी केल्या होत्या.

गोंदिया पाटबंदीजरे विभागाने प्रस्ताव तयार करून विदर्भ विकास महामंडळाला सादर केला. त्यानंतर माजी आमदार राजेंद्र जैन जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर यांनी खा. प्रफुल पटेल यांच्या माध्यमातून राज्याचे वित्तमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या निवासस्थानी भेट घेऊन सदर प्रकरण त्यांच्या लक्षात आणून दिले तेव्हा वित्तमंत्री अजितदादा पवार यांनी विदर्भ पाटबंधारे विकास मंडळाचे कार्यकारी संचालक यांच्याशी चर्चा करून सदर कामांना तातडीने मंजुरी प्रदान करावी असे निर्देश दिले. त्याला अनुसरून विदर्भ विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक यांनी सुमारे ५ कोटी खर्चाचे तलावांच्या दुरुस्तीला व खोलीकरणाच्या कामाला नुकतीच मंजुरी प्रदान केली.

यात मोरगाव ९५ लक्ष रुपये, खाडीपार ५९ लक्ष रुपये, खोडशिवानी १०१ लक्ष रुपये, मालिजंगा ७८ लक्ष रुपये, गिरोला ७२ लक्ष रुपये व कोसमतोंडी ११० लक्ष रुपये या प्रमाणे निधी मंजूर करून तातडीने कामे पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या माजी मालजुगारी तलावांच्या दुरुस्ती व खोलीकरणाच्या कामाला मंजुरी मिळाल्याने या तलावांच्या लाभ क्षेत्रातील शेतक?यांनी खा. प्रफुल पटेल, ना. अजितदादा पवार, राजेंद्र जैन, गंगाधर परशुरामकर यांचे आभार मानले आहेत.

## जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीवर जि.प.चा अधिकार, वाटणी नको

**गोंदियाः-** जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन विभागाच्या सभागृहात शुक्रवारला झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या सभेत नवनियुक्त पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्यासमोरच जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी रोखठोक भूमिका घेत जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीवर जिल्हा परिषदेचा हक्क असून त्या हक्क अधिकारावर इतरांचा हक्क आम्ही स्विकारणार नसल्याची स्पष्ट भूमिका घेतली. तर जिल्हा नियोजन समितीच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु करुन जिल्हा परिषद सदस्यांना तातडीने घेण्यात यावे, या मागणीचे निवेदनच सादर केले. तसेच जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गतच्या ३०५४,५०५४ च्या बदली कामाच्या प्रस्तावाला जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेने मंजुरी दिल्याने नियोजन समितीने सभेत मंजुरी देण्यात आली.

जिल्हा नियोजन समितीमध्ये २० जिल्हा परिषद सदस्यांचा समावेस अध्यक्ष वगळता असतो. परंतु जिल्हा परिषदेच्या निवडणुकीला दीड वर्षाचा कालावधी लोटत असतानाही जि.प.सदस्यांना सामावून घेण्यास टाळाटाळ करण्यात येत असल्याचे वृत्त मटाने प्रकाशित केले होते. त्या वृत्ताची दखल घेत जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहागडांने नियोजन समितीच्या सभेत जिल्हा परिषद सदस्यांना त्वरीत संधी देण्याची मागणी केली. यावर आता पालकमंत्री काय निर्णय घेतात याकडे लक्ष लागले आहे.

सोबतच जिल्हा परिषदेच्या मार्फत चालविल्या जाणाऱ्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना बनगाव व अर्जुनी मोरगाव तालुक्यातील सिरेगावबांध या पाणीपुरवठा योजनेच्या देखभाल दुरुस्तीकरिता शासनाकडून निधी प्राप्त होणे बंद झाल्यामुळे सदर योजना चालवण्यास जिल्हा परिषदेला अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून देखभाल दुरुस्ती अंतर्गत चार कोटी रुपयांची मागणी पालकमंत्री आत्राम यांच्याकडे जि.प.अध्यक्ष रहांगडाले यांनी निवेदनातून केली.

# अपूर्ण इमारतीच्या लोकार्पणाचा खटाटोप

**गोंदिया:** देवरी येथील ग्रामीण रुग्णालयाच्या नवीन इमारतीचे लोकार्पण दुसऱ्यांदा जिल्ह्याचे पालकमंत्री धर्मराव आत्राम यांच्या हस्ते गुरुवारी पार पडले. पहिल्यांदा आ.सहसराम कोरोटे यांनी केले होते. मात्र प्रशासन बांधकाम आणि सुविधा पूर्ण असल्याचा दावा करत असले तरी प्रत्यक्षात जुन्यालाच नवे दाखवून लोकार्पण करण्यात आल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे लोकार्पणाच्या या मुद्द्यावरुन चर्चांना उत आले आहे.

देवरी येथील ग्रामीण रुग्णालयाची इमारत जीर्ण होती. रुग्णसंख्या आणि रुग्णालयात असलेल्या सुविधा यात मोठी तफावत होती. त्यामुळे याठिकाणी नवीन इमारत तयार झाली. जुलै महिन्यात रुग्णालयात रुग्णांची संख्या वाढली होती. रुग्णांसाठी जागा अपुरी पडत होती. तर भितींना भेगा पडल्यामुळे रुग्णालयात गळती सुरु झाली होती. रुग्णालयासंदर्भात तक्रारी येत असल्याने स्थानिक आमदार सहसराम कोरोटे यांनी जुलै महिन्यात रुग्णालयाच्या जुन्या इमारतींची अकस्मिक पाहणी केली होती. त्यात गंभीर प्रकार समोर आल्याने तातडीने रुग्णांना नवीन इमारतीत हलविण्यात यावे अन्यथा १५ ऑगस्टला इमारतीचे लोकार्पण करण्याचा इशारा दिला होता. प्रशासनाशी देखील चर्चा केली होती. त्यावर आरोग्य विभागाने महिनाभरात सर्व सुविधा पुरवून महिनाभरात रुग्णालय नवीन इमारतीत स्थानांतरीत करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र अस्टिमेटम देऊन देखील आरोग्य विभागाने दुर्लक्ष केल्याने सहसराम कोरोटे यांनी १५ ऑगस्ट रोजी इमारतीचे लोकार्पण आटोपले होते. दरम्यान, माजी आ.संजयपुराम यांनी प्रोटोकॉल पाळला नाही. हा केवळ स्टंट असल्याचा आरोप केला होता. त्यात आता जिल्ह्याचे पालकमंत्री बदलले. नवीन पालकमंत्री धर्मराव आत्राम यांच्याहस्ते गुरुवारी रुग्णालय इमारतीचे उद्घाटन करण्यात आले.



### एनओसीसह हस्तांतर बाकी

**देवरील येथील ग्रामीण रुग्णालयाची नवीन इमारत अद्यापही अपूर्णच आहे. विद्युतीकरण झालेले नाही. फायर सेफ्टि सर्टिफिकेट व्यतिरिक्त इतर कोणतीही एनओसी मिळालेली नाही. त्याचबरोबर ही इमारत अद्यापही वैद्यकीय विभागाकडे हस्तांतरित झाली नाही. त्यामुळे दुसऱ्यांदा घाईघाईत उद्घाटन करण्याचा अट्टाहास कशापोटी करण्यात आला असा सवाल उपस्थित होत आहे.**

**आरोग्य विभाग रुग्णांप्रती गंभीर नाही. जुलै महिन्यात सुचना देऊन अद्यापही कामे पूर्ण झाले नाही. प्रशासन आणि शासन गोरगरीब जनतेच्या जीवाशी खेळत आहे. मी ऑगस्ट महिन्यात उद्घाटन केले तिच अवस्था अद्यापही आहे. मात्र केवळ स्टंट आणि दिखावा म्हणून गुरुवारी लोकार्पण करण्याचा प्रकार झाला. स्टंट करुन जर रुग्णांचा जीव वाचत असल्यास माझ्या शुभेच्छा.**

**सहसराम कोरोटे, आमदार**


यावेळी गोंदिया जिल्ह्याचे नवनियुक्त पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्या हस्ते देवरीच्या नव्याने बांधलेल्या रुग्णालयाचे गुरुवारी पुन्हा उद्घाटन करण्यात आले. जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे, जिल्हा परिषदेचे सीईओ अनिल पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबरीश मोहबे, माजी आ.संजय पुराम उपस्थित होते. दोन पक्षांच्या भांडणात तिसऱ्याच पक्षाने उद्घाटन केल्याचीही चर्चा परिसरात आहे. त्यातच अद्यापही इमारतीत सुविधा नाहीत. बांधकाम पूर्ण झालेले नाही. जुन्याच खाटा रंगवून ठेवण्यात आल्या. लिफ्ट व्यवस्था, ओपीडींसह अनेक कामे अद्यापही अपूर्ण आहेत. नवीन इमारतीसाठी फर्निचर नाही. वैद्यकीय उपकरणे नाहीत. एवढ्या असुविधा असताना लोकार्पणाची घाई करण्याचे औचित्य काय? असे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे.

# गोंदिया पालिकेतील नकाशांची कामे प्रभावित

## बीपीएमएस प्रणालीत तांत्रिक दोष: नागरिकांसह पालिका प्रशसन हैराण

**गोंदिया:** पालिका क्षेत्रात इमारतीचा नकाशा मंजूर करण्यासाठी अत्याधुनिक समजली जाणारी ऑटोडीसीआर प्रणाली रद्द करुन राज्य शासनाच्या महाआयटी विभागाने बीपीएमएस (बिल्डींग प्लान मॅनेजमेंट सिस्टिम) प्रणाली कार्यान्वित केली. या प्रणालीमध्ये तांत्रिक दोष असल्याचे समोर आले असून त्यामुळे नगरपालिका प्रशासन हैराण झाले आहे.

बीपीएमसद्वारे नकाशा मंजूर होत नसल्याने स्वायत्त संस्थांनी ऑफलाइन पद्धतीने नकाशा व इतर दाखले देण्याचे संकेत दिले आहेत. नगर परिषद क्षेत्रात कमर्शियल कॉम्प्लेक्स, रहिवासी इमारतीचे निर्माण करण्यासाठी नगररचना विभागाकडे नकाशा सादर करावा लागतो. कागदपत्रांची जुळवाजुळव केल्यानंतर नगररचना विभागाकडे ऑफलाइन पद्धतीने नकाशा मंजुरीचा प्रस्ताव सादर केला जाता होता. परंतु या पद्धतीमुळे मालमत्ताधारकांना जाणीवपूर्वक झुलवत ठेवण्याचे प्रमाण वाढले होते. नकाशा वेळेवर मंजूर होत नसल्याने व बांधकाम दाखले देताना अनाठायी वेळ खर्ची होत असल्याची बाब लक्षात आल्यानंतर नकाशा मंजुरीसाठी ऑटोडीसीआर प्रणालीचा आग्रह धरला. यामध्येही एकसूत्रीपणा येण्यासाठी ही प्रणाली कार्यान्वित करुन त्याचा कंत्राट पुणे येथील इन्फोटेक कंपनीला देण्यात आला होता. कालांतराने ऑटोडीसीआरच्या नियमावलीत एकसूत्रता नसल्याचे शासनाच्या निदर्शनास येताच माहिती व तंत्रज्ञान विभागाने खासगी कंपनीचे कंत्राट रद्द करुन महाआयटी विभागाची यंत्रणा कार्यान्वित करण्याचा निर्णय घेत बीपीएमएस प्रणाली कार्यान्वित केली. या कामासाठी शासन स्तरावरुन एजन्सी नियुक्त केली. तूर्तास या प्रणालीतही तांत्रिक दोष असल्याने नकाशा मंजुरीची प्रकरणे रखडल्याचे चित्र समोर येत आहे.



### अपलोड नकाशा दिसेनासा

**बीपीएमएसप्रणालीअंतर्गत बांधकामाचा नकाशा सादर करण्यासाठी नागरिकांना संकेतस्थळ उपलब्ध आहे. नागरिकांना घरबसल्या नकाशा सादर करण्यासोबतच इतर कागदपत्रे अपलोड करता येतील असा दावा केला जा-तो. बांधकामाचा नकाशा या संकेतस्थळावर अपलोड केल्यानंतर तो संबंधित उपअभियंता, सहयक नगररचनाकार तसेच नगररचनाकार यांच्याकडे क्रमवारीने न जाता मधातच गहाळ होत असल्याच्या तक्रारी आहेत. यामुळे नकाशा व इतर दाखले देण्यासाठी पुन्हा जुन्या मार्गाचा अवलंब करावा लागणार आहे.**

# युनियन बँकेच्या खातेदारांना मनस्ताप

## गोठणगाव शाखेतील कर्मचाऱ्यांची मनमानी:खातेदारांची टाळे ठोकण्याची तयारी

**अर्जुनी मोरगाव:** केशोरी परिसरासाठी युनियन बँक ऑफ इंडिया एक राष्ट्रीयकृत बँक असून या बँकेला हजारोंच्या संख्येने खातेदार जोडले आ-हेत. त्यामुळे दैनंदिन व्यवहार करताना बँकेत ग्राहकाची गर्दी असतेच. मात्र मोठ्या व्यापारी व उद्योजकांना सम्मानपूर्वक वागणूक देऊन सामान्य गोरगरीबांना मात्र ताटकळत उभे ठेवले जाते. खातेदारांशी असभ्य वर्तणूक करण्यात येत असल्याचा आरोप करुन शाखा व्यवस्थापकांना हटवा अन्यथा शाखेला कुलूप ठोकण्याचा इशारा खातेदारांनी दिला.

युनियन बँक ऑफ इंडिया शाखा तिबेट कॅम्प गोठणगाव केशोरी व परिसरातील ३० ते ४० गावांसाठी एक जुनी राष्ट्रीयकृत ग्राहकांची विश्वासपात्र बँक होती. मात्र गेल्या एक वर्षांपासून कर्मचाऱ्यांच्या अरेरावीपणामुळे सुविधा देण्यात टाळाटाळ करण्याच्या प्रवृत्तीमुळे नकोशी झाली असून अनेक ग्राहक खाते बंद करण्याच्या निर्णयापर्यंत पोह-चलेले आहेत. या बँकेत गंधारी, जांभळी, गोठणगाव, बोंडगाव ते राजोली, भरणोली, तिरखुडी, ईळदा अशा तालुक्याच्या अखेरच्या टोकावरीलही नागरिकांचा संपर्क येतो.

आर्थिक देवाण-घेवाण, आयकराकरिता लागणारे मिनी स्टेटमेंटकरिता आलेल्या ग्रामीण भागातील ग्राहकाला दिवसभर रोजगार बुडवून ताटकळत उभे राहावे लागते. नेहमी कर्मचाऱ्यांची कमतरता सांगून टाळाटाळ केली जाते. कधी व्यवस्थापक गायब, तर कधी लिपीक गायब यामुळे नागरिकांचा संताप वाढत चालला आहे. सर्व सोयी सुविधा ग्राहकांना द्यावयाच्या असतील तर व्यवस्थित आणि सुरळीत मिळाव्यात आणि जर कामाचा भार पडत असेल या उर्मट कर्मचाऱ्यांनी राजीनामे द्यावे अशाच प्रकारची दुय्यम वागणूक असेल तर बँकेला टाळे ठोकू असा इशारा खातेदारांनी दिला.



**नागरिकांना सोप्या व सहज पद्धतीने आर्थिक व्यवहार करता यावेत व देशाच्या शेवटच्या नागरिकास सुद्धा बँकींगच्या मुख्य प्रवाहात येता यावे म्हणून १९ जुलै १९६९ रोजी भारत सरकारने देशातील अनेक बँकांचे राष्ट्रीयकरण केले. बँकेत यायचे असेल तर त्रास सहन करा अन्यथा आपले खाते बंद करा. आमचा पगार बंद होणार नाही अशी उद्धट भाषा शाखा व्यवस्थापक आणि ईतर कर्मचारी व्यक्त करतात. त्यामुळे ही शाखा ग्राहकांच्या नजरेतून उतरत चालली आहे. प्रशासनाने याची दखल घेऊन या मुजोर कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी आणि केशोरी व परिसरात राष्ट्रीयकृत बँक द्यावी.**

**श्रीकांत घाटबांधे, जि.प.सदस्य**

# शहरातील गतिरोधकांनी वाढविले टेंशन

## दर पन्नास मीटरवर एक ब्रेकर: गर्भवती माता आणि वृद्धांना त्रास

**गोरेगाव:** शहरातील अंतर्गत रस्त्यांवर वारेमाप गतिरोधक तयार करण्यात आले आहेत. ते गतिरोधक विनापरवानगीने बांधले आहेत. त्यांची उंची देखील अधिक असल्यामुळे त्या ब्रेकरवरुन वाहन नेताना कमालीचा त्रास होत आहे. त्याचा सर्वाधिक फटका गर्भवती महिला आणि वृद्धांना सहन करावा लागत आहे.

शहरात सध्या वेगमर्यादेवर लक्ष ठेवण्यासाठी नगरपंचायतीच्या वतीने शहरातील अंतर्गत मार्गावर स्पीड ब्रेकर बनवले जात आ-हेत. मात्र ते आवश्यकरित्या तयार करण्यात येत आहे. स्पीड ब्रेकर्समुळे नागरिकांची अडचण होत आहे. मागणीनुसार हे स्पीड ब्रेकर्स बांधण्यात आले आहेत. मात्र, अनेक मार्गावर अत्यंत कमी अंतरावर मोठ्या प्रमाणात स्पीड ब्रेकर्स बांधण्यात आले आहेत.

आधीच शहरातील अरुंद रस्त्यांवर वाहतूक कोंडीची समस्या आहेत. त्यातच आता स्पीड ब्रेकर गरोदर महिला आणि लहान मुलांसाठी धोक्याचे ठरु लागले आहेत. गोरेगाव नगर पंचायतीतर्फे शहरात १३० स्पीड ब्रेकर्स तयार करण्यात येत आहेत. सिमेंट काँक्रीटपासून बनवण्यात येणाऱ्या स्पीड ब्रेकर्समध्ये तीन स्पीड ब्रेकर देण्यात आले आहेत. रूंद रस्त्यांवर गतिरोधक बांधणे गरजेचे आहे. मात्र जिथे रहदारी नाही, ज्याठिकाणी आधीच वाहतूक कोंडी आहे, त्या ठिकाणी गतिरोधक आता डोकेदुखी ठरु लागली आहे. दुचाकी वाहन व सायकल स्वारांना रस्ता ओलांडताना खूप त्रास होत आहे.

विशेष म्हणजे प्रशासनाने अपघातांपासून सुरक्षितेच्या दृष्टीकोनातून नगरपंचायतीने वेग नियंत्रणाकरिता स्पीड ब्रेकर बांधले आहेत. मात्र नगर पंचायतीने नियोजनाअभावी अपघताचा धोका आणखी वाढला आहे.



**गोरेगाव शहरात नागरिकांच्या मागणीनुसारच स्पीड ब्रेकर तयार केले जात आहेत. तयार केलेल्या सर्व स्पीड ब्रेकरचा आढावा घेण्यात येणार असून त्यात अनावश्यक ठिकाणी केलेले स्पीड ब्रेकर तात्काळ काढले जाईल.**

**राजीव जाधव, अभियंता नगर पंचायत**

# ONGC च्या भूगर्भशास्त्र विषयाच्या शिष्यवृत्तीत म्हसगावचा मनिष बोपचे देशात ९ व्या स्थानावर

**गोरेगाव:** तालुक्यातील म्हसगाव येथील शेतकरी कुटूबांत जन्माला आलेल्या व सध्या गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड येथील अलाय एण्ड स्टिल कंपनीत कनिष्ठ भूगर्भ शास्त्रज्ञ पदावर कार्यरत मनिष हेतराम बोपचे यांना Geology (भूगर्भ शास्त्र)विषयासाठी भारत सरकारच्या ONGC(Oil and Natural Gas Company) कडून सन २०२१-२२ या वर्षासाठी स्कॉलरशिप मिळाली आहे. मनीषने जियोलॉजी(भूगर्भ शास्त्र) विषयात भारतातून नवव्या स्थानावर तर महाराष्ट्रातून पहिल्या स्थान पटकावला आहे.




मनिषचे प्राथमिक शिक्षण म्हसगांव येथील जिल्हा परिषद शाळेत पुर्ण झाले. त्यानंतर शहीद जान्या तिम्या जिल्हा परिषद माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय, गोरेगांव येथे १२वी पर्यंतचे शिक्षण पुर्ण केले. महात्मा गांधी वरिष्ठ महाविद्यालय आरमोरी जिल्हा गडचिरोली येथून भूगर्भ शास्त्र या विषयात ८० %टक्के गुण घेवून पदवी (बी.एससी) उत्तीर्ण केली. तर संत गाडगेबाबा महाराज विद्यापीठ, अमरावती येथून पद-वूत्तर (एम.एस्सी.) अभ्यासक्रम पुर्ण केला. मनिषने आपल्या यशाचे श्रेय आई वडील, आजोबा व आपल्या शिक्षकांना दिले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितिवर मात करून आपल्या जिद्द, चिकाटी व मेहनती मुळे हे यश प्राप्त केले आहे.

# यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत ३४३ घरकुलांना मंजूरी

**गोंदिया:-** विमुक्त जाती, भटक्या जमाती या प्रवर्गातील कुटूंबाचे राहणीमान उंचावणे, त्यांच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढवून त्यांना स्थिरता प्राप्त व्हावी या उद्देशाने इतर मागास बहुजन कल्याण विभागामाफ'त विमुक्त जाती भटक्या जमाती या घटकासाठी ‍यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना राबविण्यात येते. जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी गोंदिया जिल्ह्यातील विमुक्त जाती भटक्या जमाती घटकातील ३४३ पात्र लाभार्थी कुटूंबाच्या घरकुलांना मंजूरी व प्रशासकीय मान्यता प्रदान केली.

सदर योजनेअंतर्गत ग्रामीण भागात किमान १० कुटूंबासाठी सामुहिक वसाहत योजना राबवून अथवा रमाई आवास योजनेच्या धतीवर वैयक्तिक स्वरुपात लाभ देण्यात येतो.

# पशुवैद्यकीय अधिकाऱ्या अभावी तीन वर्षापासुन दवाखाना वाऱ्यावर



### आसोली येथील प्रकार

**माझ्या कडे आसोली, अदासी, कामठा, व अर्जुनी मोरगाव येथीलअतिरिक्त प्रभार आहे. त्यामूळे मी कुठल्या ही ठिकाणी ऊपलब्ध राहु शकतो. तरीपण आलेल्या वेळेवर सेवा देण्याचा माझा प्रयत्न असतो.**

**विशाल आडे, पशु वैद्यकीय अधिकारी अदासी**

**देवेंद्र रामटेके**

**गोंदिया:-** मागच्या तीन वर्षापासून गोंदिया तालुक्यातील आसोली येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याने सदर दवाखाना वाऱ्यावर पडला की काय? असा प्रश्न परिसरातील पशुपालकांना पडला आहे. परिणामी आपल्या जनावरांचा उपचार खाजगी डॉक्टर कडून करावा लागत असून त्यासाठी शेतकऱ्यांवर मोठा आर्थिक भुर्दंड पडत आहे

आसोली येथे पशुवैद्यकीय दवाखाना असून या अंतर्गत परिसरातील नवरगाव (कला), दतोरा, मोरवाही, नवरगाव (खुर्द), मुंडीपार (खुर्द) वाटाणा, इर्री, तसेच आसोली ही गावे समाविष्ट आहेत. या परिसरातील शेतकऱ्यांकडे मोठया प्रमाणत जनावरे आहेत.त्यांच्या जनावरांच्या उपचारांसाठी हा एकमेव दवाखाना आहे. परंतु मागच्या तीन वर्षापासुन या दवाखान्यात वैद्यकीय अधिकारीच उपलब्ध नाही. परिणामी परिसरातील शेतकऱ्यांना आपल्या जनावरांचा उपचार खाजगी डॉक्टर कडून करावे लागत आहे. त्यासाठी त्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. मध्यंतरी या दवाखान्यात वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसले तरी येथील परिचर हा दव-ाखाना सांभाळीत येणाऱ्या पशु वर प्रथमोपचार करुन औषधी पुरवीत होता. त्यामूळे डॉक्टर उपलब्ध नसले तरी जनावरांचा उपचार होत होता. त्यामुळे शेतकऱ्याना अडचण होत नव्हती. परंतु त्या परीचाराचेही स्तानतरण आकसापोटी आरोग्य विभागात करण्यात आले त्यामुळे सदर दवाखाना कर्मचारी अभावी उघडे पडले आहे.

जनावरांचे संगोपन करुन त्यांचे आरोग्य सुदृढ राहावे म्हणून पशु वैद्यकीय दवाखान्याची सुरुवात करण्यात आली परंतु या दवाखान्यात कर्मचारी उप-लब्ध नसल्याने परिसरातील शेतकऱ्यांना मोठा फटका बसत आहे. या गावाला माजी जिल्हा परिषद अध्यक्ष असा मोठा राजकीय वारसा लाभूनही या गावातील पशु वैद्यकीय दवाखान्यांची स्थिती लाजिरवाणी झाली आहे. मध्यंतरी एका साथीच्या रोगाने जनावरांना सडो की पडो करुन सोडले. त्यात मोठ्या प्रमाणात परिसरातील जनावरे दगावली असल्याची बोलले जात आहे. सदर दवाखान्यात वैद्यकीय अधिकारी नाहीं, परंतु परीचाराला तरी ऊपलब्ध राहु दया जेणेकरून जनावरांचे प्रार्थमिक उपचार तरी करता येईल अशी मागणी परिसरातील शेतऱ्यांकडून होत आहे.

# ज्ञान दान हे सर्वश्रेष्ठ दान-इंजि.यशवंत गणविर




**अर्जुनी मोरगाव:-** आजचे युग हे स्पर्धेचे, विज्ञान तंत्रज्ञानाचे युग आहे आणि आजच्या या युगात टिकून राहण्यासाठी शिक्षण हा महत्त्वाचा घटक आहे. आज इथे आपण केलेल्या उल्लेखनीय कार्याची पावती म्हणून आपला सत्कार करण्यात आला. पण आपण इथेच न थांबता शेवटच्या श्वासापर्यंत ज्ञानदानाचे कार्य करत रहावे कारण ज्ञान दान सर्वात श्रेष्ठ दान असे जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा सभापती शिक्षण क्रीडा व आरोग्य इंजि यशवंत गणविर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते येथील उमेद भवन येथे आयोजित तालुका मुख्याध्यापक संघाच्या सेवानिवृत्ती सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले, आपण आपल्या कार्यकाळात अनेक गुणवंत विद्यार्थी घडविण्याचे कार्य केले. प्रत्येक क्षेत्रात आपल्या हातुन घडलेले विद्यार्थी कार्य करत आहेत ते क्षेत्र राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असतील आणि स्वतः चे, गावाचे नावलौकिक करत असतील हिच आपल्या सेवानिवृत्तीची खरी पावती आहे. असे समजुन पुढेही आपले कार्य सुरू ठेवावे. असे प्रतिपादन त्यांनी केले.

या कार्यक्रमाप्रसंगी शिक्षणाधिकारी (माध्य) कादर शेख, पंचायत समितीचे उपसभापती होमराज पुस्तोडे, गटशिक्षणाधिकारी रुषी मांढरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती यशवंत परशुरामकर, मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष दुर्गाप्रसाद पटले, तालुकाध्यक्ष सुनिल पाऊलझगडे, सामाजिक कार्यकर्ते आर.के. जांभुळकर, माजी पंचायत समिती सदस्य जनार्धन काळसर्पे, तालुका मुख्याध्यापक संघाचे पदाधिकारी, सर्व मुख्याध्यापक, सेवानिवृत्ती मुख्याध्यापक उपस्थित होते.

# प्रथम आगमन निमित्त पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांचे भव्य स्वागत

**गोंदिया:-** जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पदाधिकारी व कार्यकर्ता बैठक पार्टी कार्यालय, रेलटोली, गोंदिया येथे जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धर्मरावबाबा आत्राम यांच्या उपस्थितीत गुरुवारला पार पडली.पालकमंत्री ना.धर्मरावबाबा आत्राम यांच्या गोंदिया येथे प्रथम आगमन निमित्त भव्य स्वागत करण्यात आले. सदर बैठकीला माजी आमदार राजेंद्र जैन, जिल्हाध्यक्ष गंगाधर परश-ुरामकर यांनी पक्ष संघटन, आगामी निवडणूकाची तयारी, बूथ कमिटीचे सशक्तीकरण, विविध समित्यांवर पक्षाच्या कार्यकर्त्यांना संधी देण्याबाबत विचार व्यक्त केले.

राजेंद्र जैन पुढे म्हणाले की, खा. प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वात जिल्ह्याच्या विकासासाठी सदैव प्रयत्न चालू आहेत. गोंदिया जिल्हा हा शेतकऱ्यांचा जिल्हा आहे आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी नेहमी कार्य करणारे श्री पटेल हे येणाऱ्या दिवसात राज्याचे वित्त मंत्री, मुख्यमंत्री व अन्न पुरवठा मंत्री सोबत लवकरात लवकर धान खरेदी केंद्र चालू करणे व धानाला बोनस देण्यासंदर्भात चर्चा करणार आहेत. तसेच पालकमंत्री या नात्याने जिल्ह्याच्या विकासासाठी निधी उप-लब्ध करणे व मेडिकल कॉलेज इमारत बांधकामाचा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी श्री जैन यांनी केली.

याप्रसंगी पालकमंत्री श्री आत्राम म्हणाले कि, गोंदिया जिल्ह्याला लाभलेले नेतृत्व श्री पटेल यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्यातील प्रश्न मार्गी लावण्याचे काम निश्चितच करणार याची ग्वाही दिली. श्री पटेल सतत शेतकऱ्यांच्या हिताचे प्रश्नांचा सरकार कडे पाठपुरावा करित असतात. जलसिंचनाच्या सोयी, गोंदिया येथे मेडिकल कॉलेज, बिरसी विमानतळ, अदानी प्रकल्प यासारखे अनेक विकासात्मक कामे प्रफुल पटेल साहेबांच्या माध्यमातून झालेली आहेत.



यावेळी सर्वश्री राजेंद्र जैन, गंगाधर परशुरामकर, राजलक्ष्मी तुरकर, डॉ. अविनाश जायसवाल, अजय गौर, प्रभाकर दोनोडे, केतन तुरकर, विशाल शेंडे, रफिक खान, यशवंत गणवीर, सुरेश हर्षे, पुजा अखिलेश सेठ, सुधा राहांगडाले, बालु बावनथडे, किरण पारधी, अश्विनी पटले, अजय उमाटे, कुंदन कटारे, सि के बिसेन, बालकृष्ण पटले, केवल बघेले, लोकपाल गहाने, प्रेमकुमार रहांगडाले, अविनाश काशीवार, कमलबापु बाहेकार, सुशिला हलमारे, आम्रपाली डोंगरवार, शंकर टेंभरे, किशोर तरोने, गोपाल तिवारी, घनश्याम मस्करे, अखिलेश सेठ, रजनी गिरीपुंजे, माधुरी नासरे, दुर्गा तिराले, कविता रहांगडाले, रवि पटले, विनोद पंधरे, अशोक सहारे, करण टेकाम, सुशीला भालेराव, पुष्पलता दुर्गकर, आशा पाटिल, सरला चिखलोंडे, नरेश कुंभारे, विनीत सहारे, विजय रगडे, सुनिल भालेराव, सोमेश रहांगडाले, डी.यु. रहांगडाले, संदीप मेश्राम, टिकाराम मेंढे, लवली होरा, रवी मुंदडा, राजेश गणेरीया, मनोहर वालदे, जगदिश बाहेकार, शंकर सहारे, मदन चिखलोंडे, राजेश तुरकर, लिकेश चिखलोंडे, हरबष गुरनानी, जिम्मी गुप्ता, लखन बहेलिया, वेनेश्वर पंचबुध्दे, पदमलाल चौरीवार, धर्मराज कटरे, रमेश कुरील, बंटी चौबे, नितीन टेंभरे, दिलीप डोंगरे, सुरेंद्र रहांगडाले, कृष्णकुमार बिसेन, खुशाल वैद्य, नासीर घानीवाल, श्याम कुमार फाये, धर्मेंद्र गणवीर, सयाराम भेलावे, प्रभुदयाल फरकुंडे, हर्षवर्धन मेश्राम, सुनिल पटले, शैलेष वासनिक, पिंटु बनकर, बबलु ढोमने, संजय डोये, विनोद चुटे, पन्नालाल डहारे, महेश तांडेकर, संजय शेंडे, रमेश रहांगडाले, हौसलाल रहांगडाले, उमेश ठाकरे, राकेश वर्मा, डॉ रशिद, हरीराम आस-वानी, अलकेश मिश्रा, किशोर पारधी, मनोहर राउत, हेमराज डाहाके, नानू मुदलियार, तिलकचंद पटले, जितेंद्र बिसेन, आनंद ठाकुर, दानेश साखरे, भोजराज चौव्हान, खालीद पठान, लालचंद चौव्हान, घनेश्वर तिरेले, तुषार उके, अनुज जयसवाल, राहुल शेंडे, राहुल वालदे, भगत ठकरानी, नागो बंसोड,चंद्रकुमार चुटे, भागेस बीजेवार, योगेश पतेह, संजीव राय, संदिप पटले, नरहरप्रसाद मस्करे,सचिन शेंडे, प्रतिक पारधी, कपील बावन-थडे, प्रमोद कोसरकर, रौनक ठाकुर, कान्हा बघेले, नरेंद्र बेलगे, कुणाल बावनथडे, शरभ मिश्रा सह सर्व तालुका अध्यक्ष, जि.प.सदस्य, पं.स.सदस्य, नगरपंचायत अध्यक्ष व सदस्य, सर्व सेलचे अध्यक्ष व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ता मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बेरडीपारच्या आरोग्यवर्धिनी केंद्राला मुहूर्ताची प्रतीक्षा

**गोंदिया:** तिरोडा तालुक्यातील बेरडीपार येथे गेल्या दोन वर्षांपासून आरोग्यवर्धिनी केंद्राची सुसज्ज इमारत उभी आहे. मात्र, इमारत उभी झाली असली तरी त्यातील संबंधित सोयी सुविधा शासनाकडून पुरविण्यात आल्या नसल्याने अजुनपर्यंत आरोग्य केंद्र सुरु झाले नाही. त्यामुळे ही इमारत शोभेची वास्तू ठरत आहे. दरम्यान, ही आरोग्यवर्धिनी केंद्र सुरु करण्यासाठी मूहूर्त कधी निघेल असा प्रश्न परिसरातील नागरिकांकडून केला जात आहे.

आयुष्यमान भरत योजनेअंतर्गत आरोग्यवर्धिनी कार्यक्रम केंद्र शासनाचा एक महत्वाकांक्षी कार्यक्रम आहे. सार्वजनिक आरोग्यविषयीची सेवा जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठीच्या प्रयत्नांचा भाग म्हणून राज्यातील सर्व उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे टप्याटप्याने आरोग्य वर्धिनी केंद्रामध्ये रूपांतर करण्यात आले. केंद्रामध्ये समुदाय आरोग्य अधिकारी पदावर आयुर्वेद, युनानी नर्सिंग पदवीधारकांसह १५ कर्मचारी नियुक्त केले जा-तात. आरोग्य सेविका, बहुद्देशीय आरोग्यसेवक, आशा कार्यकर्त्या यांच्या माध्यमातून आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये व त्याअंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये प्राथमिक आरोग्य सुविधा बळकटीकरणाचा सरकारचा मानस आहे.




तब्बल १३ प्रकारच्या आरोग्य सेवा या केंद्रामार्फत दिल्या जा-तात. त्यामुळे एक प्रकारे आरोग्य सुविधा आणि सेवा वाढल्याचे पाहायला मिळत आहे. मात्र, बेरडीपार येथील आरोग्यवर्धिनी केंद्र याला अपवाद ठरत आहे. महत्वाचे म्हणजे २०१८ पासून या केंद्राचे नामविस्तारही झाले नाही. आता आयुष्यमान भारत आरोग्यवर्धिनी उपकेंद्र व आरोग्य वर्धिनी प्राथमिक आरोग्य केंद्र अशी या आरोग्य केंद्राची ओळख निर्माण झाली आहे.

दरम्यान, दोन वर्षापुर्वी ६.५ कोटी रुपये खर्च करुन सुसज्ज आरोग्यवर्धिनी केंद्राची इमारत तयार करण्यात आली. इमारतीतील फर्निचर व इतर सोयीसुविधांसाठी जवळपास १ कोटी रुपये खर्च केले आहे. परंतु आवश्यक मनुष्यबळ, रस्ता व पाणी या सोयी सुविधाअभावी ही इमारत शोभेची वस्तू ठरली आहे. तेव्हा या केंद्राच्या शुभारंभाचा मुहूर्त कधी मिळणार असा प्रश्न परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

# पालकमंत्र्यांच्या पहिल्याच भेटीत आरोग्य सेवा बळकटीकरणावर भर



- सडक अर्जुनी ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन
- आता १०० खाटांचे होणार रुग्णालय
- अद्ययावत होणार आरोग्य सेवा
- जिल्हा विकासाचे अनेक निर्णय

**गोंदिया:** आरोग्य, शिक्षण, रोजगार निर्मिती व शेतीला प्राधान्य देत राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी आपल्या पहिल्याच जिल्हा दौऱ्यात रस्ते विकास, रोजगार निर्मिती व आरोग्य सेवा बळकटीकरणावर भर दिला आहे. यासोबतच ओबीसी मुलांसाठी वसतिगृह, तिरोडा येथे अतिरिक्त एमआयडीसी, लाख निर्मिती उद्योग, मानव विकास अंतर्गत जादा बसेस व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे सौर ऊर्जाकरण आदी विषय मार्गी लावून शिक्षण व रोजगार निर्मितीला प्राधान्य दिले.

पालकमंत्री श्री. आत्राम हे २६ व २७ ऑक्टोबर असे दोन दिवस जिल्हा दौऱ्यावर होते. देवरी येथील ग्रामीण रुग्णालयाच्या लोकार्पण सोहळ्यात देवरी रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून शंभर खाटांचे रुग्णालय करण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत. त्याचप्रमाणे मौजा केशोरी ता. अर्जुनी मोरगांव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करणे, अर्जुनी मोरगाव येथील ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालयाचे ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करणे, सडक अर्जुनी येथील ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याच्या प्रस्तावाला जिल्हा नियोजन समितीमध्ये मंजुरी प्रदान करून आरोग्य सेवा बळकटीकरणावर भर दिला आहे.

जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने विविध विषयांवर या बैठकीत चर्चा करण्यात आली. ओबीसी विद्यार्थ्यांच्या साठी मंजूर वस्तीगृहाच्या जागेच्या अनुषंगाने तातडीने कारवाई करावी वस्तीगृह सुरू व्हावे या दृष्टीने लवकरात लवकर नियोजन करण्यात यावे अशी सूचना खासदारांनी यावेळी केली. इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी गोंदिया येथे वसतिगृहाची मागणी होती. नवीन वसतिगृह बांधण्यासाठी जागा सुनिश्चित करण्यात आली असून या जागेची मोजणी व हस्तांतरण नोव्हेंबर अखेर होणार आहे. नवीन इमारत होईपर्यंत वसतिगृहासाठी भाडेतत्त्वावर इमारत घेण्याबाबत पालकमंत्र्यांनी तात्काळ मंजुरी दिली आहे. पुढील शैक्षणिक सत्रापासून मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू होणार आहे.

रोजगाराला प्राधान्यक्रम देत जिल्ह्यात लाख निर्मिती उद्योग उभारण्यात येणार आहे. मानव विकास व महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून लाख उद्योग निर्मिती होणार असून या विषयीचे प्रशिक्षण देणे सुद्धा सुरू झाले आहे. हा विषय तातडीने मार्गी लावण्यासाठी पालकमंत्री नियमित आढावा घेणार आहेत. तिरोडा येथे अतिरिक्त एमआयडीसी निर्माण करण्याबाबत पालकमंत्री सकारात्मक असून तिरोडा एम आयडीसी निर्मितीमुळे भविष्यात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होईल.

गाव ते शाळा प्रवास करण्यासाठी विद्यार्थिनींना मानव विकास अंतर्गत एसटी बस सुविधा पुरविली जाते. मानव विकास अंतर्गत ५६ बस उपलब्ध असून त्याचे मार्ग सुनिश्चित आहेत. या बस अपुऱ्या असल्यामुळे विद्यार्थिनींची अडचण होत आहे ही बाब लक्षात घेता अतिरिक्त बस उपलब्ध करून देण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत.

जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत इतर जिल्हा मार्ग विकास व ग्रामीण मार्ग मजबुतीकरणाला नियोजन समिती बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. भगवान बिरसा मुंडा ग्रामीण रस्ते विकास योजनेत आदिवासी भागातील रस्त्यांसाठी पाच हजार कोटी निधी शासनाने मंजूर केला असून या योजनेत मोठ्या प्रमाणात रस्त्याची कामे घेण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या. यामुळे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रस्त्याचे जाळे विणले जाणार आहे.

वीज बिल थकल्यामुळे ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजना बंद स्थितीत आल्या आहेत. अशा योजनांची देयक भरण्यासाठीचा प्रस्ताव तयार करण्यात येणार आहे. या प्रस्तावाचा पालकमंत्री स्वतः शासनाकडे पाठपुरावा करणार आहेत. ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजनांचे सौर ऊर्जाकरण करण्यासाठी पालकमंत्र्यांनी मंजुरी दिली आहे. वीज व सौर ऊर्जा अशा दुहेरी जोडणीवर या योजना आणण्यात येणार आहेत. शाळा, घर, शासकीय इमारतीवरून जाणाऱ्या ओव्हरहेड लाइनमुळे व रस्त्यात येणाऱ्या विद्युत खांबामुळे धोका निर्माण होत असून ओव्हरहेड लाईन शिफ्ट करण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. पालकमंत्र्यांच्या पहिल्याच दौऱ्यात घेण्यात आलेल्या धडाकेबाज निर्णयामुळे जिल्ह्याच्या विकासाला गती प्राप्त झाली आहे.

# पोलीसींगच्या माध्यमातून जनतेला चांगली सेवा दयावी–पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम

- रावणवाडी पोलीस स्टेशन इमारतीचे पालकमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण
- पोलीस विभाग गतिमान करण्याच्या दृष्टीने ३२ वाहनांचे लोकार्पण
- पोलीस ठाणे नागरिकांच्या सेवेत रुजू, मॅराथॉन स्पर्धेचे आयोजन



**गोंदिया :** महाराष्ट्र–मध्यप्रदेश सीमेवर लागुन असणारे उत्तर दिशेकडील सीमावर्ती भागातील गोंदिया जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्याचे सीमेवरील शेवटच्या टोकावर असलेले रावणवाडी येथे सुसज्ज अशी पोलीस स्टेशनची नविन इमारत तयार करण्यात आलेली आहे. अशा या सुसज्ज इमारतीतून पोलीसींगच्या माध्यमातून जनतेला चांगली सेवा देण्यात यावी, असे प्रतिपादन अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी केले.

२७ ऑक्टोबर रोजी गोंदिया तालुक्यातील रावणवाडी पोलीस स्टेशनच्या नविन इमारतीचे उद्घाटन केल्यानंतर आयोजित कार्यक्रमात उपस्थितांना संबोधित करतांना श्री. आत्राम बोलत होते. आमदार सर्वश्री विनोद अग्रवाल, मनोहर चंद्रिकापुरे, डॉ.अभिजीत वंजारी, तसेच जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक अशोक बनकर, जि.प.उपाध्यक्ष यशवंत गणवीर यावेळी मंचावर उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई यांच्या मार्फत ४ कोटी ९७ लाख रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या सुसज्ज अशा रावणवाडी पोलीस स्टेशन इमारतीचे तसेच पोलीस विभाग गतिमान करण्याच्या दृष्टीने जिल्हा नियोजन समिती अंतर्गत प्राप्त अनुदानातून एकूण ३२ वाहनाचे आज पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

पालकमंत्री श्री. आत्राम म्हणाले, रावणवाडी येथील पोलीस स्टेशनच्या इमारतीचा फायदा या परिसरातील जनतेला नक्कीच होणार आहे. या पोलीस स्टेशनमध्ये नागरिकांनी निर्भयपणे येवून आपल्या समस्यांचे निराकरण करावे. गुन्हेगाराला शिक्षा होवून सर्वसामान्य माणसाला सुरक्षा मिळाली पाहिजे असे पोलीस प्रशासनाने काम करावे. सर्वसामान्य माणसामध्ये पोलीसांबाबत विश्वास निर्माण झाला पाहिजे. गुन्हेगारांवर आळा घालण्यासाठी पोलीस यशस्वी होतील असा विश्वास व्यक्त करुन या पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या गावांना पोलीस व जनतेच्या समन्वयातून जनतेच्या अपेक्षा पूर्ण होतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

आमदार मनोहर चंद्रिकापुरे म्हणाले, पोलीस दल, जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद प्रशासन व लोकप्रतिनिधीसोबत नागरिकांचा सहभाग असणे गरजेचे आहे. पोलीस दलाने तत्पर राहून या पोलीस स्टेशनमध्ये येणा?या नागरिकांना त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना सहकार्य करावे अशी आशा व्यक्त केली.

आमदार विनोद अग्रवाल म्हणाले, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधीक्षक एक कर्तव्यदक्ष म्हणून जिल्ह्यात काम करीत आहेत. तसेच या इमारतीत काम करणाऱ्या पोलीस दलाने सुध्दा तत्पर राहून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, गुन्ह्यांवर आळा घालणे व जनतेच्या समस्यांचे निराकरण केले तर गोंदिया जिल्हा विकासाला निश्चित रुपाने पुढे जाईल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

आमदार डॉ.अभिजित वंजारी म्हणाले, रावणवाडी पोलीस स्टेशनला ज्या इमारतीची गरज होती, ती इमारत आता तयार झालेली आहे. पोलीस दलाने अधिक सक्षमपणे काम करावे. पदभरती झाली पाहिजे, बेरोजगारांना रोजगार मिळाला पाहिजे अशी आशा व्यक्त करुन सायबर क्राईम ही आज काळाची गरज आहे असे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे म्हणाले, या पोलीस स्टेशनमध्ये लोकांना चांगली वागणूक देण्यात यावी. जनतेच्या प्रश्नांचा जास्तीत जास्त प्रमाणात निपटारा करण्यात यावा. पोलीस दलाने लोकांना सहकार्य करण्यास नेहमीच तत्पर राहावे. या पोलीस स्टेशनच्या माध्यमातून जनतेला निश्चितच न्याय मिळेल अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

प्रास्ताविकातून पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे म्हणाले, नवनिर्मित रावणवाडी पोलीस ठाणे इमारतीचे बांधकाम २०,००० चौ.मी. एवढ्या क्षेत्रात असून प्रत्येक अधिकाऱ्यांसाठी व प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र कक्ष तयार करण्यात आले आहेत. सध्या या पोलीस ठाण्यात १ पोलीस निरीक्षक, ३ सहाय्यक पोलीस निरीक्षक, २ पोलीस उपनिरीक्षक व ४५ पोलीस अमलदार असे मनुष्यबळ कार्यरत आहे. सीमावर्ती भागातील सदर पोलीस ठाण्याचे ठिकाण लक्षात घेता, आंतरराज्य गुन्हे करणारे गुन्हेगार, त्यांच्या टोळ्या तसेच आंतरराज्य मद्य, नशेचे पदार्थ, जनावरे अथवा शस्त्राची होणारी अवैध तस्करी यावर अंकुश बसण्यासाठी याद्वारे मदत होणार आहे. सदर पोलीस स्टेशन इमारतीत ठाणेदार कक्ष (पोलीस निरीक्षक), पोलीस उपनिरीक्षक कक्ष, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक कक्ष, गोपनीय कक्ष, पोलीस निरीक्षक रायटर कक्ष, बिनतारी/दळणवळण कक्ष, कॉम्पॅक्टर कक्ष/दस्ताऐवज कक्ष, रायटर कक्ष, विद्युत कक्ष, स्टेशनरी कक्ष, तपास पथक कक्ष, पुरुष चौकशी कक्ष, पुरुष बंदीगृह, महिला बंदीगृह, गार्ड रुम, सी.सी.टी.एन.एस. कक्ष व आवक–जावक कक्ष कार्यरत असणार आहेत असे त्यांनी सांगितले.




यावेळी ५ कि.मी. मिनी मॅराथॉन दौडचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पुरुष गटात अमोल चचाणे, मिलिंदकुमार कोवे, रोहीत पटले, रितीक मस्करे, गुरुदेव दमाहे आणि महिला गटात सुषमा रहांगडाले, दिव्या मडावी, हिना मुनेश्वर, निशा ढगे, आरती भगत या खेळाडूंनी मॅराथॉन दौडमध्ये प्राविण्य प्राप्त केल्याबद्दल पालकमंत्र्यांच्या हस्ते त्यांना मेडल देवून त्यांचा गौरव करण्यात आला.

कायक्रमास जिल्हा परिषद व पंचायत समिती पदाधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील ताजणे, रावणवाडी पोलीस स्टेशनचे ठाणेदार पुरुषोत्तम अहेरकर, तहसिलदार समशेर पठाण, गृहनिर्माण विभाग कनिष्ठ अभियंता रोशन हिंगवे, सर्व पोलीस अधिकारी, खेळाडू व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन करुन उपस्थितांचे आभार अपर पोलीस अधीक्षक अशोक बनकर यांनी मानले.




# झेंडेपार लोहाखाणीविरोधात नक्षलवाद्यांची पत्रकबाजी

**गडचिरोली :** झेंडेपार लोहखाणीसाठी केवळ ४६ हेक्टरवर उत्खनन करणार असल्याचे कागदोपत्री नमूद आहे. मात्र, त्यांना या परिसरातील एक हजार हेक्टरवर खाण सुरू करायची आहे. यामुळे त्याभागातील पर्यावरण धोक्यात येणार असून या खाणीला आमचा विरोध असल्याचे नक्षलवाद्यांनी पत्रकाच्या माध्यमातून जाहीर केल्याने एकच खळबळ उडाली आहे. समाज माध्यमावर सार्वत्रिक झालेल्या या पत्रकात नक्षलवाद्यांच्या पश्चिम सबझोनल ब्युरो प्रवक्ता श्रीनिवास याचे नाव आहे.

उत्तर गडचिरोलीतील कोरची तालुक्यात येत असलेल्या झेंडेपार टेकडीवरील लोहखाणीत उत्खननाच्या परवानगीसाठी १० ऑक्टोबरला जिल्हाधिकारी कार्यालयात पर्यावरणविषयक जनसुनावणी पार पडली. यावेळी कोरची तालुक्यातील ग्रामसभा आणि स्थानिकांनी विरोध दर्शवला होता. त्यांच्या समर्थनार्थ आता नक्षलवाद्यांनी पत्रक काढले आहे. यात खाणीमुळे पारंपरिक जंगल नष्ट होऊन त्यावर अवलंबून असलेल्या आदिवासींचे जीवन सुध्दा धोक्यात येईल, परिसरातील धार्मिकस्थळ यामुळे प्रभावित होणार असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

प्रशासन कागदोपत्री ४६ हेक्टरवर हे उत्खनन होणार असल्याचे जाहीर करत आहे. मात्र, हे खोटे असून पोलीस बळाच्या वापर करुन एक हजार हेक्टरवर उत्खनन करण्याचा प्रशासनाचा डाव आहे. यासाठी त्याभागातील मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल करण्यात येणार आहे. सूरजागडमध्ये हेच सुरू आहे. येत्या काळात पूर्ण जिल्ह्यात खाणी सुरू करण्याचा कार्पोरेट कंपन्यांचा डाव आहे. त्यामुळे खाणविरोधी आंदोलनाला आमचा पाठिंबा असल्याचे नक्षल्यांनी पत्रकात नमूद केले आहे.

## तर ओबीसी महाराष्ट्रात पेटून उठेल–खासदार रामदास तडस

**नागपूर :** मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी आमचा विरोध नाही. मात्र जरांगे पाटील यांची ओबीसीमधून मराठा समाजाला आरक्षण द्या या मागणीला आमचा विरोध आहे. ओबीसीमधून आरक्षण दिले तर महाराष्ट्रात ओबीसी पेटून उठल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा महाराष्ट्रा प्रांतिक तैलिक महासभेचे अध्यक्ष व भाजपाचे खासदार रामदास तडस यांनी दिला.



जवाहर वसतिगृहात प्रांतिक तैलिक महासभेची बैठक झाली. या बैठकीनंतर ते प्रसार माध्यमाशी बोलत होते. मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी विरोध नाही. पण ओबीसीतून आमच्या अधिकारातून हे आरक्षण सरकारला देता येणार नाही, तसेच आम्ही गेल्या अनेक वर्षांपासून जातीनिहाय जनगणनेची मागणी करतो आहे.

सरकारने जातीनिहाय जनगणना करावी म्हणजे ओबीसी किती आहे हे वास्तव समोर येईल. जरांगे पाटील यांच्या दबावात येऊन कुठलाही निर्णय सरकारने घेऊ नये. जरांगेनी टोकाची भूमिका घेऊ नये अन्यथा ओबीसी समाज शांत बसणार नाही. हा मुद्दा या बैठकीमध्ये लावून धरण्यात आला आहे. तसेच त्या अनुषंगानेसुद्धा पावले सरकारने उचलावी अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच इतर महामंडळाप्रमाणे महाराष्ट्रातसुद्धा तेलघाणा महामंडळ स्थापण करावे असाही ठराव या बैठकीत घेण्यात आल्याचे तडस यांनी सांगितले

# सोंटू जैनच्या गोंदियातील घर, दुकान, हॉटेलची घेतली झाडाझडती




**गोंदिया:** "ऑनलाइन गेमिंग' फसवणूक प्रकरणाचा तपास करणाऱ्या नागपूर गुन्हे शाखा आणि आर्थिक गुन्हे शाखेचे पथक अनंत उर्फ सौंटू जैन याच्यासह आरोपीच्या काका चौक, सिव्हिल लाइन्स गोंदिया येथील घरी गुरुवार २६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ८ वाजता शारीरिक पडताळणीसाठी पोहोचले. येथे ५८ कोट्यवधी रुपयांच्या ऑनलाइन फसवणुकीच्या प्रकरणासंदर्भात घराची झडती घेण्यात आली. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, यादरम्यान काही भूखंड आणि भूखंडांच्या व्यवहाराशी संबंधित रक्कम आणि रजिस्ट्रीची कागदपत्रे जप्त करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.

गुरुवारी रात्री साडेआठ वाजता गुन्हे शाखेचे पोलिस पथक सौंटू जैन यांच्या दुकानातील नोकरांसह गोरेलाल चौक ते श्री टॉकीज चौक या मुख्य रस्त्यावर असलेल्या "कुतावाला' नावाच्या दुकानात पोहोचले, जेथे दुकान बंद होते. सेवकांचे हातानी शटर उघडून रात्री साडेअकरा वाजेपर्यंत कसून झडती घेण्यात आली. सुप्रीम कोर्टाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्यानंतर बुकी अनंत उर्फ सौंटू जैन याने नागपूरच्या कनिष्ठ न्यायालयात आत्मसमर्पण केले होते. सखोल चौकशीनंतर काही नावे समोर आली ज्याच्या आधारे सौंटू जैनचा मित्र डॉ. गौरव बग्गा डॉ. गरिमा बग्गा याला नागपूर पोलिसांनी या दाम्पत्याच्या घरावर छापा टाकला तेथून मोठ्या प्रमाणात रोकड आणि सोने जप्त करण्यात आले.

सौंटू जैन यांच्या लॉकरमधून रोख रक्कम आणि सोने अक्सिस बँकेतील अन्य तीन लॉकरमध्ये नेल्याप्रकरणी बँक व्यवस्थापक अंकेश खंडेलवाल यालाही पोलिसांनी अटक केली होती. सौंटू जैनला पळून जाण्यास कोणी मदत केली, याचाही सविस्तर तपास करण्यात आला असून, याप्रकरणी आरोपींची सतत चौकशी सुरू आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जुने बस स्टँड रोडवरील पेट्रोल पंपाच्या मागे असलेले लॅविश हॉटेलचे द्वार पोलिसांनी ठोठावले. तसेच हॉटेलचा शोध घेतला जात असल्याची माहितीही समोर येत आहे. या चौकशीमुळे आता गोंदियातील काही व्हाईट कॉलर चेहऱ्यांचा पर्दाफाश होण्याची शक्यता व्यक्त केली जात असली तरी, या छाप्यात कोणत्या वस्तू जप्त केल्या आहेत, याचा सविस्तर खुलासा नागपूर पोलिसांचे उच्चपदस्थ अधिकारी लवकरच नागपुरात करणार असल्याचे कळविण्यात आले आहे.

# शासकीय योजनांचा लाभ नागरिकांना देण्यासाठी योग्य नियोजन करा–पालकमंत्री

## देवरी येथील जनता दरबारात पालकमंत्र्यांनी सोडविल्या नागरिकांच्या समस्या

**गोंदिया :** "शासन आपल्या दारी' अंतर्गत छत्रपती शिवाजी महाविद्यालय देवरी येथे आयोजित जनता दरबारात अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी जनतेच्या तक्रारी व समस्या जाणून घेतल्या. प्रशासनाने नागरिकांच्या समस्या व तक्रारींचे तातडीने निराकरण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. नागरिकांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रत्येक विभागाने योग्य नियोजनासह अंमलबजावणी करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी केल्या. जनता दरबारात प्राप्त तक्रारी व समस्या सोडविण्यासाठी त्या त्या विभागाने कालबद्ध कार्यक्रम तयार करावा. नागरिकांच्या तक्रारींचे काय झाले या बाबतीत प्रत्येक महिन्याला आढावा घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. उपविभागीय अधिकारी चंद्रभान खंडाईत, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळीकर, प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यावेळी उपस्थित होते.

मनरेगाचा, सामूहिक वनहक्क आराखडा, योजनांचा लाभ, आरोग्य सेवा बळकटीकरण, रोजगार निर्मिती, कृषी योजनांचा लाभ, शेतीच्या तक्रारी, सिंचन, शेती पंप देयक, आदिवासी विभागाचे प्रश्न यासह नागरिकांनी विविध समस्या व तक्रारी पालकमंत्र्यांकडे मांडल्या. नागरिकांच्या सर्व तक्रारींचे निराकरण करुन एक महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी संबंधित विभागाला दिले.

आजच्या जनता दरबारात नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवून आपल्या तक्रारी व समस्या मांडल्या. नागरिकांच्या सर्व तक्रारी व समस्या तात्काळ निकाली काढण्यात येतील असे पालकमंत्री यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपविभागीय अधिकारी श्री. खंडाईत यांनी केले. जनता दरबारात विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



## देवरीच्या ग्रामीण रुग्णालयाचे पालकमंत्र्यांच्या हस्ते दुसऱ्यांदा लोकार्पण

**देवरी तालुक्यातील दोन लाख लोकांच्या सेवेसाठी ग्रामीण रुग्णलायाची प्रशस्त इमारत तयार करण्यात आली. या इमारतीतून जनतेला आरोग्याच्या उत्तम सेवा मिळणे अपेक्षित आहे. इमारतीच्या स्वच्छतेवर अधिक भर देत इमारत दिली त्या अवस्थेत ठेवण्याची जबाबदारी आरोग विभागाच्या प्रशासनावर आहे, असे प्रतिपादन राज्याचे अन्न व औषधी प्रशासन मंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री ना. बाबा धर्मराव आत्राम यांनी आज बुधवारी ग्रामीण रुग्णालयाच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी केले. पालकमंत्र्यांनी जिल्ह्यात होणाऱ्या ड्रग्स आयातीवर चांगलीच चिंता व्यक्त केली. या गुन्ह्यातील आरोपींवर मोक्का लावण्याचा इशारा सुद्धा त्यांनी यावेळी दिला. ते पुढे म्हणाले की, देवरी हे तालुक्याचे ठिकाण वर्दळीच्या महामार्गावर असल्याने अपघातग्रस्तांना सुद्धा उपचार मिळावेत यासाठी येथे १०० खाट्यांच्या रुग्णालयाचे प्रस्ताव लवकर तयार करुन सादर करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.**

# जिल्ह्यात होणार पुन्हा स्वच्छतेचा जागर

- संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाला सुरुवात
- जिल्हा परिषद गटस्तरापासून तर राज्यस्तरापर्यंत मिळणार अनेक बक्षिसे

**गोंदिया:** ग्रामीण भागातील जनतेचे आरोग्यमान, जीवनस्तर उंचावण्यासाठी राज्य शासनाकडून विविध अभियान राबविण्यात येतात. परिसर स्वच्छता आणि नागरिकांच्या सक्रीय सहभागातून संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान पुन्हा अधिक जोमाने राबविण्यात येणार असून ११ ऑक्टोबरपासून या अभियानाची सुरुवात झालेली असून ३० जानेवारी २०२४ अखेरपर्यंत सदर अभियान राबविण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्हयात पुन्हा स्वच्छतेचा जागर होणार आहे.

अभियानाच्या माध्यमातून गावांमध्ये तयार होणा?या स्वच्छतेच्या नव्या सुविधा, नागरिकांचे स्वच्छतेबाबतीत होणारे

मतपरिवर्तन व गावागावांतून सुरु असलेल्या स्वच्छतेच्या चळवळीत ग्रामीण भागातील सर्व नागरिक, ग्रामस्थांचा सक्रीय व सातत्यपूर्ण सहभाग घेवून त्यांच्या वेगवेगळया ग्रामपंचायती, तालुके व जिल्हयात स्वच्छतेच्या विविध पैलुंतील प्रगतीबाबत एक सर्व समावेशक स्पर्धा राबवून व त्या माध्यमातून ग्रामस्थांना प्रोत्साहित करून स्वच्छतेच्या कार्यक्रमाचा आपलेपणा व महत्व पटवून देण्याकरिता जिल्हयात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे.




संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातून जिल्हयात स्वच्छतेचा जागर करून ग्रामपंचायतीत समाविष्ट गावातील वैयक्तिक शौचालये, त्यांचा वापर, मागणी, हागणदारीमुक्त तपासणीचा अहवाल, त्याअनुषंगाने दुरुस्त करावयाची शौचालये, एक खड्डा ते दोन खड्डा करावयाची शौचालये, गावे हागणदारीमुक्त म्हणून घोषित करण्याकरिता करावयाची कार्यवाही व पूर्तता या बाबत ठोस कृती कार्यक्रम आखून १५ नोव्हेंबरपर्यंत ग्राम पंचायत स्तरावर समिती गठण व कृती कार्यक्रम निश्चित करण्यात येणार आहे. २१ नोव्हेंबर ते २१ डिसेंबर २०२३ या काळात जिल्हा परिषद गट स्तरावर स्पर्धा व तपासणी करण्यात येणार आहे.

२१ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर अखेर जिल्हा परिषद गट स्तरावर प्राथमिक तपासणी करण्यात येणार आहे. ६ ते २१ डिसेंबर अखेर जिल्हा परिषद गट अंतिम तपासणी केली जाणार आहे. २२ डिसेंबर २०२३ ते ६ जानेवारी २०२४ अखेर जिल्हा स्तरावरील तपासणी व ७ जानेवारी ते ३० जानेवारी २०२४ अखेर विभागीय स्तरावर तपासणी केली जाणार आहे.

## शाश्वत स्वच्छतेच्या महायज्ञात सहभागी व्हा–जि.प. अध्यक्ष पंकज रहांगडाले

**गावात शाश्वत स्वच्छतेच्या या महायज्ञात सर्व ग्रामपंचायती, नागरिक, गांव व तालुकास्तरीय कर्मचारी, अधिकारी तसेच लोकप्रतिनिधी यांनी सक्रीय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान जिल्हास्तरीय संनियंत्रण समिती अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी केले आहे.**

## अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करा–मुकाअ अनिल पाटील

**संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान सन २०२३–२४ अंतर्गत जिल्हयातील प्रत्येक ग्रामपंचायतीने यात सहभागी होवून अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करावी. या अभियानाच्या माध्यमातून गांवे आदर्श करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी केले आहे**

अशी मिळणार बक्षिसे :– राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेअंतर्गत ग्रामपंचायतींना जिल्हा परिषद गटस्तरावर प्रथम ६० हजार रुपये, जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांकास ६ लाख रुपये, द्वितीय क्रमांकास ४ लाख रुपये, तृतीय क्रमांकास ३ लाख रुपये, विभाग स्तरावर प्रथम क्रमांकास १२ लाख रुपये, द्वितीय क्रमांकास ९ लाख रुपये, तृतीय क्रमांकास ७ लाख रुपये, राज्यस्तरावर प्रथम क्रमांकास ५० लाख रुपये, द्वितीय क्रमांकास ३५ लाख रुपये, तृतीय क्रमांकास ३० लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे. स्व. वसंतराव नाईक पुरस्कार घनकचरा, सांडपाणी व मैलागाळ व्यवस्थापन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पाणी गुणवत्ता व पाणी व्यवस्थापन पुरस्कार तसेच स्व. आबासाहेब खेडकर शौचालय व्यवस्थापन पुरस्कारासाठी ग्राम पंचायतीस विशेष पुरस्कार दिला जाणार असून जिल्हा स्तरावर प्रत्येकी ५० हजार रुपये, विभाग स्तरावर ७५ हजार रुपये त राज्य स्तरावर ३ लाख रुपये देण्यात येणार आहे.